




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २१३ * नांदेड * मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## झारखंडमध्ये आंदोलक विद्यार्थी थेट पोहचले विधानसभेच्या गेटवर, बॅरिकेड्स तोडले

### पोलिसांचा लाठीचार्ज, अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या



**रांची (प्रतिनिधी)–** झारखंडमधील रांची येथे जेपीएससी-जेएसएससी परीक्षा घोटाळ्याविरोधात आंदोलन करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्स तोडून विधानसभेच्या गेटपर्यंत मजल मारली. विद्यार्थ्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. पोलीस आणि विद्यार्थ्यांमध्ये अनेकवेळा संघर्ष झाला. दोन-तीन वेळा लाठीचार्ज करावा लागला. काही विद्यार्थ्यांच्या डोक्याला दुखापत झाली. आंदोलकांनी पोलिसांवर पाण्याच्या बाटल्या आणि चपलाही फेकल्या.

सकाळी १० वाजता विद्यार्थी जुन्या विधानसभा भवनाजवळ जमले आणि त्यानंतर त्यांनी विधानसभेला घेराव घातला. पोलिसांनी काटेरी तारांचे बॅरिकेड्स उभारले होते. पोलिसांनी पाण्याचे फवारे मारताच, विद्यार्थी बॅरिकेड्सवर चढून नाचताना दिसले. काही विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत गायले. त्यानंतर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या सोडल्या. सहा स्तरी सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, सीआयडीने जेपीएससीचे माजी अध्यक्ष एल. क्यंगटे यांना अटक केली आहे. २१ जुलै रोजी जेपीएससी कार्यालयावर छापा टाकल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला होता. सीआयडी त्यांची सतत चौकशी करत आहे. झारखंडमध्ये पीएससी-एसएससी परीक्षा रद्द करण्याच्या मागणीसाठी गेल्या १७ दिवसांपासून आंदोलन सुरू आहे.

## परभणीत रुग्णवाहिकेला उशीर झाल्याने गर्भवतीसह बाळाचा मृत्यू, ५ जणांविरुद्ध गुन्हा

**परभणी (प्रतिनिधी)-** अपघातस्थळी कधीही वेळेवर न पोहोचणारी सरकारची तातडीची सेवा असलेली १०८ रुग्णवाहिकेचा आणखी एक प्रताप समोर आला आहे. जिंतूर येथे ७ महिन्याच्या गर्भवती महिलेला वेळेत उपचार न मिळाल्याने तिच्यासह गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, या महिलेसाठी ७ वेळा १०८ या रुग्णवाहिकेस फोन केला, फोन करुन २ तास उलटले तरीही रुग्णवाहिका न मिळाल्याने हा गंभीर प्रकार घडल्याचे सांगण्यात येते. परभणीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात घडलेल्या या घटनेनंतर १०८ रुग्णवाहिका सेवेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून शहरातील कोतवाली पोलीस ठाण्यात रुग्णवाहिका चालक संबंधित डॉक्टर तसेच स्त्री रुग्णालयातील डॉक्टर अशा एकूण ५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्याच्या जिंतूर शहरातील साठे नगर येथील मरजीनाबी अमीन शेख या सात महिन्यांच्या गर्भवती महिलेला श्वास घेण्यास त्रास होत असल्याने ती उपचारासाठी धडपडत होती.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी आ. डॉ. तुषार राठोड, उपाध्यक्षपदी डॉ. मीनल पाटील खतगावकर यांची निवड



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचा कणा असलेल्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नवीन संचालक मंडळाची पहिली विशेष सर्वसाधारण सभा सोमवारी उत्साहात पार पडली. या सभेत अध्यक्षपदी भाजपचे मुखेडचे आमदार डॉ. तुषार राठोड तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या डॉ. मीनल पाटील खतगावकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष प्रणित शेतकरी विकास पॅनल ने २३ पैकी तब्बल २१ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. त्यामुळे बँकेच्या राजकारणात भाजपची ताकद प्रचंड वाढली असून आगामी काळात जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची चिन्हे आहेत.

**अध्यक्षपदावर भाजपचा शिक्का**

बँकेच्या अध्यक्षपदासाठी निवडणुकीपूर्वीपासूनच जोरदार चर्चा सुरू होती. या पदासाठी ज्येष्ठ संचालक बी. आर. कदम, मारोतराव कवळे गुरुजी, प्रा. राजेंद्र केशवे आणि डॉ. मिनलताई पाटील खतगावकर यांची नावे आघाडीवर होती. मात्र सर्वांच्या अंदाजांना छेद देत मंडळाने एकमताने डॉ. तुषार राठोड यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

अध्यक्षपदासाठी डॉ. राठोड यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला. त्यांच्या अर्जाला सूचक म्हणून प्रा. राजीव केशवे आणि अनुमोदक म्हणून मारुती जाधव यांनी सही केली. विरोधी अर्ज दाखल न झाल्याने डॉ. राठोड यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

**उपाध्यक्षपदी डॉ. मिनलताई पाटील खतगावकर**

उपाध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व असलेल्या डॉ. मिनलताई पाटील खतगावकर यांची निवड करण्यात आली. त्यांच्या नावाला राजू गंगाधर जाधव यांनी सूचक आणि सौ. संगीता विठ्ठल पाटील डक यांनी अनुमोदक म्हणून पाठिंबा दिला. सहकारातील प्रदीर्घ अनुभव आणि सर्व घटकांशी असलेला जनसंपर्क लक्षात घेता त्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. परंतु अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या पदाचा दीड-दीड वर्षांचा फार्मुला ठरला असल्याची चर्चा होती.

**शेतकरी विकास पॅनलचा ऐतिहासिक विजय**

या निवडणुकीत शेतकरी विकास पॅनल ने २३ पैकी २१ जागा जिंकून मोठा विजय मिळवला. परंतु अपक्ष म्हणून निवडून आलेल्या सौ संगीता विठ्ठल पाटील डक यांनी आपले मत शेतकरी विकास पॅनलच्या पारड्यात टाकले तर कृष्णा नागेश पाटील आष्टीकर हे एकमेव संचालक गैरहजर असल्याचे सांगण्यात आले. या विजयामुळे बँकेच्या संचालक मंडळावर भाजपचे वर्चस्व निर्माण झाले आहे. जिल्ह्याच्या राजकारणावरही याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

निवड झाल्यानंतर नवीन अध्यक्ष डॉ. तुषार राठोड यांनी माध्यमांशी बोलताना म्हणाले की, सभासदांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही. शेतकऱ्यांना कमी व्याजदरात वेळेवर कर्ज, ठेवीदारांना सुरक्षितता आणि बँकेच्या कामकाजात पारदर्शकता आणणे हे आमचे प्राधान्य राहील. बँकेला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम बनवून जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत बँकेच्या योजना पोहोचवू.

तसेच उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. मिनलताई खतगावकर म्हणाल्या की, सहकार हा शेतकऱ्यांच्या उन्नतीचा पाया आहे. नवीन संचालक मंडळ एकत्रितपणे काम करून बँकेला राज्यातील आदर्श बँक बनवण्याचा प्रयत्न करेल.

बँकेच्या या नवीन पर्वामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकरी आणि ठेवीदारांना मोठ्या अपेक्षा आहेत. पारदर्शक कारभार आणि शेतकरीहिताच्या धोरणांमुळे बँक नव्या उंचीवर जाईल, असा विश्वास सर्व स्तरातून व्यक्त होत आहे. निवडणूक निर्णय अधिकारी स्वराज शाहू हे होते. यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार भीमराव केराम आदींची उपस्थिती होती.

## सुप्रिया सुळे यांनी घेतली राष्ट्रवादीच्या खासदारांसह पंतप्रधान मोदींची भेट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांपासून राज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एनडीएमध्ये विलीन होणार अशी चर्चा रंगली असतानाच, सोमवारी दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदारांनी भेट घेतली. या खासदारांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व खासदार सुप्रिया सुळे यांनी केलं. जवळपास अर्धा तास ही बैठक झाल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीमध्ये राज्यातील प्रश्नांसह इतर प्रश्नांवरती सुद्धा चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, संबंधित खासदारांनी आपल्या लोकसभा मतदारसंघातील समस्या पंतप्रधानांकडे मांडल्याचं समोर येत आहे. यामध्ये काही ठिकाणी पूरपरिस्थिती, तर काही ठिकाणी पावसाचा अजूनही थांगपत्ता नसल्याने, तसेच पिकांच्या किंमती संदर्भात, तर काहींनी विकासाच्या संदर्भात मुद्दे उपस्थित केल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीसाठी राष्ट्रवादीमधील ८ खासदार उपस्थित होते. खासदारांनी आपल्या समस्या या पंतप्रधानांकडे मांडण्यात आल्या आहेत. यावेळी पंतप्रधानांनी या खासदारांचे म्हणणे ऐकून घेऊन, त्या समस्या सोडवल्या जातील असं आश्वासन दिल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या बैठकीमध्ये राष्ट्रवादीकडून महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, कवी अण्णाभाऊ साठे आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न देण्याची मागणी करण्यात आली आहे.

दुसरीकडे, ही वरवरची चर्चा दिसत असली तरी, गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाविषयी एनडीएमध्ये विलीन होण्याची चर्चा चांगलीच रंगली आहे. कालसुद्धा राज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचा मुंबई ते कोल्हापूरपर्यंत एकत्र विमानातून प्रवास झाला होता, तसेच जयंत पाटील यांना सुद्धा अर्थमंत्रीपदाचा प्रस्ताव असल्याची सुद्धा चर्चा समोर आली होती. या सर्व पार्श्वभूमीवर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदारांनी घेतलेल्या भेटींमुळे एक प्रकारे यासंदर्भात राष्ट्रवादी आम्ही भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत थेट चर्चा करू शकतो असे संकेत दिले आहेत का, याचीसुद्धा चर्चा रंगली आहे.

दरम्यान, लोकसभेमध्ये पुढील काही दिवस निर्णायक असणार आहेत. लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना विधेयक पुन्हा एकदा नव्याने आणण्याची तयारी भाजपकडून केली जात आहे. यासाठी गेल्या काही महिन्यांपासून फोडाफोडी सुरू होती आणि या फोडाफोडीमध्ये शरद पवारांचे खासदार असल्याचं सुद्धा बोललं जात आहे.

## कर्नाटकातून येणाऱ्या अवैध गुटख्यासह १४ लाखांचा ऐवज नांदेडमध्ये जप्त; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल, एलसीबीची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत प्रतिबंधित गुटखा व पानमसाला वाहतूक करणाऱ्या टोयोटा इनोव्हासह एकूण १३ लाख ९९ हजार ८५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई दि. १० ऑगस्ट रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत करण्यात आली.

पोउपनि मिलिंद सोनकांबळे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, नांदेड ग्रामीण हद्दीतून अर्सजन मार्गे लातूर फाट्याकडे (एमएच-१२-आरआर) क्रमांकाची टोयोटा इनोव्हा प्रतिबंधित गुटखा घेऊन जाणार होती.

माहितीच्या आधारे पथकाने वाहनाची तपासणी केली असता त्यात विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला मोठ्या प्रमाणात आढळून आला. पंचांच्या उपस्थितीत पंचनामा करून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी टोयोटा इनोव्हा कार एमएच-१२-आरआर-४५३६ - १० लाख रुपये, विमल प्रतिबंधित गुटखा ८९, ८७२ रुपये, पानमसाला व संबंधित पदार्थ - ७२, ४६८ रुपये, तर जर्दा - ३३, ८८० रुपये, इतर प्रतिबंधित गुटखा- ३,६३० रुपये असा १३ लाख ९९ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

शेख फाजील शेख अफजल, वय २८, व्यवसाय व्यापारी, शेख तौफीक शेख रफीक, वय ३१, व्यवसाय चालक आणि शेख अनिस शेख चांद (वय २३, व्यवसाय व्यापारी सर्व रा. विजयनगर, पूर्णा, जि. परभणी) यांना ताब्यात घेण्यात आले. मात्र घटनास्थळावरून एकजण पसार झाला. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हाणेगाव आश्रमशाळेत अन्नातून विषबाधा; मांसाहारानंतर ३२ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली, चौकशीची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील हाणेगाव येथील वसंतराव नाईक निवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना दिलेल्या मांसाहारी भोजनातून विषबाधा झाल्याची गंभीर घटना रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी रात्री उघडकीस आली आहे. या घटनेत एकूण ३२ विद्यार्थ्यांना विषबाधेचा त्रास झाला असून त्यात २८ मुले आणि ४ मुलींचा समावेश आहे.

शाळेत दिलेल्या जेवणानंतर काही वेळातच विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ आणि पोटदुखीचा त्रास सुरू झाला. पाहता पाहता अनेक




विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याने शाळेत एकच गोंधळ उडाला. सर्व बाधित विद्यार्थ्यांना तातडीने देगलूर येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तात्काळ उपचार सुरू केले असून बहुतेक विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

घटनेची माहिती मिळताच पालकांनी रुग्णालयात धाव घेतली. निवासी विद्यार्थ्यांच्या आहाराची जबाबदारी शाळेवर असताना अशी घटना घडल्याने पालकांनी आश्रमशाळा प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

या प्रकरणामुळे शाळेतील भोजन व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शासनाकडून निधी उपलब्ध असतानाही अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता आणि साठवणुकीबाबत दक्षता घेतली जात नसल्याचा आरोप पालकांनी केला आहे. काही पालकांनी जेवणात वापरलेल्या चिकनच्या दर्जाबतही शंका व्यक्त करत अन्नाचा नमुना प्रयोगशाळेत तपासण्याची मागणी केली आहे.

या प्रकरणी आश्रमशाळेचे अधीक्षक, मुख्याध्यापक, स्वयंपाक कर्मचारी आणि भोजन समिती यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी पालकांनी केली आहे. निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सकस आहार मिळावा हा विश्वास डळमळीत झाला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. संबंधित विभागाने तातडीने चौकशी करून भोजन व्यवस्थेचे ऑडिट, स्वयंपाकघर आणि अन्नसाठ्याची तपासणी करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## मनाठा पोलिसांचा पाठलाग; बॅरिकेड उडवून पळालेल्या कारमधून ८ पोत्यात २४० किलो गोमांस जप्त

### हदगाव- वारंगा रोडवरील घटना; चालक व साथीदार फरार

**नांदेड (प्रतिनिधी)–** नागपूर- तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील हदगाव- वारंगा रोडवर गोमांसाची तस्करी करणाऱ्या कारवर मनाठा पोलिसांनी धाडसी कारवाई केली. या कारवाईत २४० किलो गोमांसासह ७ लाख रुपये किमतीची इर्टिका कार जप्त करण्यात आली आहे. ही घटना रविवार दि. ९ ऑगस्ट रोजी पहाटे ६ च्या सुमारास घडली.

११२ क्रमांकावर हदगावकडून वारंगाकडे इर्टिका कारमध्ये गोमांस जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक विलास चवळी यांच्या मार्गदर्शनाखाली मनाठा पाटीवर बॅरिकेड लावून तपासणी सुरू होती. पोलीस कर्मचारी अतुल नागरगोजे व सहकारी तपासणी करीत असताना एमएच-४६ बीक्यू-६४३५ क्रमांकाच्या इर्टिकाच्या चालकाने बॅरिकेड तोडून भरधाव वेगाने वारंगाच्या दिशेने पळ काढला. पोलिसांनी तात्काळ पाठलाग केला.वारंगा येथील नवी आबादी या मानवी वस्तीत कार थांबवून चालक व त्याचा साथीदार दोघेही वाहन सोडून पळून गेले. कारची तपासणी केली असता त्यात वेगवेगळ्या ८ पोत्यांमध्ये २४० किलो गोमांस बांधून ठेवलेले आढळले. जप्त केलेल्या गोमांसाची अंदाजे किंमत ६० हजार रुपये तर कारची किंमत ७ लाख रुपये आहे.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी अतुल नागरगोजे यांच्या फिर्यादीवरून मनाठा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक विलास चवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या कारवाईत पोउपनि पिराजी गायकवाड, पोउपनि इंगोले, बिट जमादार अशोक दाडे, जमादार रावले, जमादार सोनटक्के, कर्मचारी नरवाडे यांनी सहभाग घेतला.

## आ. कल्याणकर यांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक; हनुमानगड व पंचमुखी परमेश्वर मंदिराला पर्यटन दर्जा देण्याबाबत चर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासोबतच धार्मिक स्थळांच्या विकासासाठी आ. बालाजीराव कल्याणकर यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. याच अनुषंगाने त्यांनी सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

नांदेड शहरातील प्रसिद्ध हनुमानगड मंदिर आणि कासारखेडा येथील पंचमुखी परमेश्वर मंदिर या दोन्ही धार्मिक स्थळांना राज्यस्तरीय तीर्थक्षेत्र आणि पर्यटनाचा दर्जा मिळवून देण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली.

बैठकीत आ. कल्याणकर यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, दोन्ही मंदिरांना तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळाचा दर्जा मिळवून देण्यासाठी आवश्यक



कार्यवाही तातडीने पूर्ण करावी आणि त्याचा प्रस्ताव शासनाकडे त्वरित सादर करावा.

हनुमानगड मंदिर हे नांदेड शहराचे श्रद्धास्थान असून दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. तसेच कासारखेडा येथील पंचमुखी परमेश्वर मंदिरालाही मोठे धार्मिक महत्त्व आहे. या दोन्ही स्थळांना दर्जा मिळाल्यास धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल, असे आ. कल्याणकर यांनी सांगितले.

यावेळी मरळक येथील २२०/३३ केव्ही वीज केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देऊन काम लवकरात लवकर पूर्ण करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

या बैठकीस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर, मनपा उपायुक्त गिरीष कदम, नायब तहसीलदार दिग्गलवार, पावडेवाडी उपजिल्हा रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. पांडुरंग पावडे, परिवहन विभागाचे देशमुख, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष नारायण कदम, तालुकाप्रमुख धनंजय पावडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शेतकऱ्यांसाठी उपयुक्त योजना, पण...

राज्य मंत्रिमंडळाने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना आणखी तीन वर्षे सुरू ठेवण्याचा आणि तिचा विस्तार करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. शेती हा निसर्गावर अवलंबून असलेला आणि अनेक प्रकारच्या जोखमींनी वेढलेला व्यवसाय आहे. पाऊस, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, यंत्रसामग्रीचे अपघात किंवा रस्ते अपघात अशा अनेक संकटांना शेतकरी आणि शेतमजूर रोज सामोरे जातात. अशा परिस्थितीत अपघातामुळे कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचा मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास संपूर्ण कुटुंब आर्थिक संकटात सापडते. त्यामुळे या योजनेचा विस्तार हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून ग्रामीण समाजाला दिलासा देणारा सामाजिक सुरक्षा उपक्रम आहे. या निर्णयातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे महिला शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुरांचा योजनेत समावेश. आज ग्रामीण भागात महिलांचे शेतीतील योगदान अत्यंत मोठे आहे. पेरणी, निंदणी, कापणीपासून पशुपालनापर्यंत अनेक जबाबदाऱ्या महिला सांभाळतात. मात्र, अनेकदा त्यांच्या नावावर जमीन नसल्याने त्या सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहत होत्या. त्याचप्रमाणे भूमिहीन शेतमजूर हे शेतीच्या उत्पादन प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक असूनही त्यांच्यासाठी सामाजिक सुरक्षा मर्यादित होती. या दोन्ही घटकांना संरक्षणाच्या कक्षेत आणणे म्हणजे ग्रामीण वास्तवाची दखल घेतल्याचे प्रतीक आहे. योजनेतील आणखी एक महत्त्वपूर्ण बदल म्हणजे शेतकरी कुटुंबातील केवळ दोन सदस्यांऐवजी सर्व सदस्यांना संरक्षण देण्याचा निर्णय. शेती ही संपूर्ण कुटुंबाच्या श्रमांवर चालणारी व्यवस्था आहे. त्यामुळे अपघाताचा धोका केवळ कुटुंबप्रमुखापुरता मर्यादित नसतो. सर्व सदस्यांना लाभ देण्याचा निर्णय अधिक न्याय्य आणि वास्तववादी आहे. अपघाती मृत्यूसाठी दोन लाख रुपये आणि अपंगत्वानुसार एक ते दोन लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देण्याची तरतूद निश्चितच दिलासादायक आहे. मात्र, महागाईच्या पार्श्वभूमीवर ही रक्कम भविष्यात टप्प्याटप्प्याने वाढविण्याची गरजही सरकारने लक्षात घ्यायला हवी. एखाद्या कुटुंबाचा आधारवड गमावल्यावर केवळ दोन लाख रुपयांत त्यांचे दीर्घकालीन पुनर्वसन शक्य होत नाही. त्यामुळे ही योजना आर्थिक मदतीसोबत पुनर्वसन आणि कौशल्यविकासाच्या कार्यक्रमांशी जोडली गेली, तर तिचा परिणाम अधिक व्यापक होईल. सरकारने स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल सुरू करून अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. डिजिटल प्रणालीमुळे पारदर्शकता वाढेल आणि विलंब कमी होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र, ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांना ऑनलाईन अर्ज, कागदपत्रे अपलोड करणे किंवा तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करणे कठीण जाते. त्यामुळे ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि महसूल यंत्रणेच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर मदत केंद्रे उभारली गेली, तर योजनेचा लाभ अधिक प्रभावीपणे पोहोचू शकेल. या योजनेसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. निधीची उपलब्धता महत्त्वाची असली तरी त्याहून महत्त्वाची बाब म्हणजे वेळेत मंजुरी आणि तातडीने अनुदान वितरण. अनेकदा लाभार्थ्यांना महिनोन्महिने कागदपत्रांच्या पडताळणीसाठी प्रतीक्षा करावी लागते. अशा विलंबामुळे योजनेचा उद्देशच अपूर्ण राहतो. त्यामुळे निश्चित कालमर्यादेत अर्ज निकाली काढण्याची जबाबदारी प्रशासनावर निश्चित केली पाहिजे. मंत्रिमंडळाने याच बैठकीत राज्यातील विविध ठिकाणी नवीन न्यायालयांना मंजुरी, राज्य माहिती आयोगात अतिरिक्त आयुक्तांची नियुक्ती आणि शासकीय कार्यालयांसाठी संयुक्त वीज बिलिंग प्रणाली लागू करण्याचे निर्णयही घेतले आहेत. हे निर्णय प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. विशेषतः किनवट येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय मंजूर झाल्याने त्या भागातील नागरिकांना न्यायासाठी होणारी धावपळ कमी होण्याची अपेक्षा आहे. एकंदरीत, शेतकरी अपघात सुरक्षा योजनेचा विस्तार हा ग्रामीण महाराष्ट्रासाठी आशादायी निर्णय आहे. मात्र, कोणतीही योजना तिच्या घोषणेमुळे नव्हे तर प्रभावी अंमलबजावणीमुळे यशस्वी ठरते. पात्र लाभार्थ्यांची अचूक नोंदणी, सुलभ अर्ज प्रक्रिया, वेळेत आर्थिक मदत आणि जनजागृती या चार बाबींवर सरकारने विशेष भर दिल्यास ही योजना खऱ्या अर्थाने शेतकरी, महिला आणि शेतमजुरांसाठी आधारवड ठरेल. ग्रामीण कुटुंबांना संकटाच्या काळात सुरक्षिततेची हमी देणारी ही योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष जीवनात दिलासा देणारी ठरणे, हीच आता राज्य शासनापुढील खरी कसोटी आहे.

# देशभक्तीचे बदलते रंग : रणभूमीपासून ओटीटीपर्यंतचा प्रवास



भारतीय सिनेमाच्या सुरुवातीच्या काळापासूनच देशभक्ती हा प्रेक्षकांच्या भावविश्वाला स्पर्श करणारा आणि चित्रपटांच्या यशाचा विश्वासार्ह आधार ठरलेला विषय आहे. काळ बदलला, समाज बदलला आणि प्रेक्षकांची अभिरुचीही बदलली; मात्र देशप्रेमाची भावना आजही तितकीच प्रभावी आहे. फरक एवढाच की, पडद्यावर व्यक्त होणाऱ्या देशभक्तीचे स्वरूप आता अधिक व्यापक आणि विविधांगी झाले आहे. प्रत्येक काळातील चित्रपट निर्मात्यांनी त्या वेळची सामाजिक आणि राजकीय गरज ओळखून देशभक्ती वेगवेगळ्या पद्धतीने मांडली. काही चित्रपटांनी स्वातंत्र्यलढ्यातील नायकांच्या शौर्यकथा सांगितल्या, काहींनी भारत-पाकिस्तान युद्धांची पार्श्वभूमी घेतली, तर काहींनी गुप्तहेरांच्या साहसकथांमधून राष्ट्रप्रेमाची भावना जागवली.

व्यावसायिकदृष्ट्याही हा फॉर्म्युला प्रभावी ठरला. कारण देशभक्तीपर चित्रपट प्रेक्षकांच्या मनात एकाच वेळी देशाभिमान, संवेदना आणि रोमांच निर्माण करतात. दीर्घकाळ ही भावनिक ताकदच अशा चित्रपटांच्या लोकप्रियतेचे प्रमुख कारण ठरली. मात्र, आजचा प्रेक्षक केवळ देशप्रेमाच्या घोषणा किंवा रणांगणावरील शौर्य पाहून समाधानी होत नाही. त्याला देशप्रेमासोबत मानवी संघर्ष, नैतिक द्वंद्व, ऐतिहासिक वास्तव, राजकीय गुंतागुंत आणि खऱ्या घटनांची पार्श्वभूमी असलेल्या कथा अधिक भावतात. त्यामुळे देशभक्ती आता केवळ मोठ्या पडद्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. ओटीटीच्या माध्यमातून तिचे अनेक नवे पैलू प्रेक्षकांसमोर येत आहेत.

**भारत-पाकिस्तान आणि देशभक्ती**

देशभक्तीपर चित्रपटांचा एक मोठा काळ भारत-पाकिस्तान संघर्षाभोवती फिरत राहिला. सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांचे शौर्य, त्याग आणि मातृभूमीसाठीचे बलिदान हे या कथांचे केंद्र होते. ‘बॉर्डर’, ‘बॉर्डर-२’, ‘एलओसी : कारगिल’ आणि ‘लक्ष्य’ यांसारख्या चित्रपटांनी युद्ध आणि देशभक्तीची सांगड घालत प्रेक्षकांना भावनिकदृष्ट्या जोडले. सैनिकांचे शौर्य, कुटुंबापासून दूर राहण्याची वेदना आणि देशासाठी सर्वस्व अर्पण करण्याची भावना या चित्रपटांमधून प्रभावीपणे समोर आली. दुसरीकडे, ‘गदर’ आणि ‘गदर-२’ यांनी प्रेमकथा आणि राष्ट्रवाद यांचे अनोखे मिश्रण सादर केले. भावनिक कथानक, आक्रमक राष्ट्रप्रेम आणि मनोरंजन यांचा मेळ साधत या चित्रपटांनी प्रेक्षकांची मोठी पसंती मिळवली आणि बॉक्स ऑफिसवरही उल्लेखनीय यश मिळवले.

**देशभक्तीचे बदलते रंग**

काळ जसजसा पुढे गेला, तसतसे देशभक्तीचे सिनेमातील रूपही बदलले. चित्रपट निर्माते केवळ युद्ध, शत्रू आणि विजय याभोवती कथा गुंफण्याऐवजी देशप्रेमाच्या अधिक सूक्ष्म आणि मानवी बाजू मांडू लागले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ‘राजी’. या चित्रपटात ना आक्रमक राष्ट्रवादाचा अतिरेक आहे, ना पाकिस्तानविरोधी घोषणांचा भडिमार. एका सामान्य भारतीय तरुणीचा गुप्तहेर म्हणून सुरू होणारा प्रवास आणि देशासाठी तिला करावा लागणारा निःशब्द त्याग यामधून दिग्दर्शिका मेघना गुलजार यांनी देशप्रेम म्हणजे केवळ घोषणा नव्हे, तर अनेकदा स्वतःचे अस्तित्व आणि भावना बाजूला ठेवून केलेला त्यागही असतो, हे प्रभावीपणे मांडले. ‘सरदार उधम’नेही देशभक्तीला वेगळा आयाम दिला. जालियनवाला बाग हत्याकांडाची वेदना, त्यातून निर्माण झालेला संताप आणि प्रतिशोधाची भावना या सर्वांचा अत्यंत संयत आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून मागोवा या चित्रपटाने घेतला. अशा चित्रपटांमुळे देशभक्तीपर सिनेमा केवळ मनोरंजनाचे माध्यम न राहता इतिहासाच्या वेदना, संघर्ष आणि स्मृती जिवंत ठेवणारे प्रभावी माध्यम बनला आहे. आज देशभक्तीपर चित्रपट केवळ जोश निर्माण करण्यापुरते मर्यादित नाहीत. ते इतिहास, राजकारण, कूटनीती, राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवी मूल्यांवरही विचार करायला भाग पाडतात. हीच भारतीय सिनेमाच्या प्रगल्भतेची खूण आहे.

**विस्तारलेला आवाका**

अलीकडच्या काळात देशभक्तीपर चित्रपटांचा आवाका आणखी विस्तारला आहे. ‘शेरशाह’मध्ये कारगिल युद्धातील शहीद कॅप्टन विक्रम बत्रा यांचे जीवन संवेदनशीलतेने आणि प्रामाणिकपणे मांडण्यात आले. ‘केसरी’ने ब्रिटिश इंडियन आर्मीच्या २१ शीख सैनिकांच्या शौर्याची कथा सांगितली, तर ‘सॅम बहादूर’ने फील्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांचे व्यक्तिमत्त्व, नेतृत्वगुण आणि १९७१च्या युद्धातील त्यांची भूमिका प्रभावीपणे उभी केली. या चित्रपटांनी एक महत्त्वाचा संदेश दिला देशभक्ती म्हणजे केवळ हातात शस्त्र घेऊन रणांगणात उतरणे नव्हे; दूरदृष्टी, नेतृत्व, निर्णयक्षमता आणि नैतिक धैर्य यांचाही देशसेवेत तितकाच महत्त्वाचा वाटा असतो. ‘आर्टिकल ३७०’ने जम्मू-काश्मीरमधून अनुच्छेद ३७० हटविण्याच्या राजकीय आणि सुरक्षाविषयक प्रक्रियेला सिनेमाच्या माध्यमातून मांडले. ‘स्काय फोर्स’ने भारतीय वायुसेनेच्या सुरुवातीच्या काळातील धाडसी मोहिमांवर प्रकाश टाकत वायुसैनिकांच्या योगदानाची कथा प्रेक्षकांसमोर आणली. म्हणजेच, देशभक्तीचा पट आता सैनिकांपासून गुप्तहेरांपर्यंत, राजकारणापासून कूटनीतीपर्यंत आणि इतिहासापासून राष्ट्रीय सुरक्षेपर्यंत विस्तारला आहे.

**ओटीटीने दिला नवा आयाम**

ओटीटीच्या आगमनामुळे देशभक्तीपर कथांना आणखी मोठे व्यासपीठ मिळाले. पारंपरिक चित्रपटांपेक्षा वेब सीरिजमध्ये कथानकासाठी अधिक वेळ उपलब्ध असल्याने पात्रांचे आयुष्य, त्यांचे संघर्ष आणि घटनांची पार्श्वभूमी अधिक सविस्तरपणे मांडता येते. ‘स्पेशल ऑप्स’ने भारतीय गुप्तचर यंत्रणांच्या प्रदीर्घ आणि गुंतागुंतीच्या संघर्षाची कथा रंजक पद्धतीने मांडली. ‘द फॅमिली मॅन’ने देशाच्या सुरक्षेची जबाबदारी आणि कौटुंबिक कर्तव्ये यांच्यात समतोल साधताना एका गुप्तचर अधिकाऱ्याला करावा लागणारा संघर्ष प्रभावीपणे दाखवला. ‘कोड एम’, ‘द टेस्ट केस’, ‘पीओडब्ल्यू : बंदी युद्ध के’, ‘बोस : डेड/अलाइव्ह’ आणि ‘द फॉरगॉटन आर्मी’ यांसारख्या वेब सीरिजनी देशभक्तीची व्याप्ती आणखी वाढवली. देशभक्ती म्हणजे केवळ रणभूमीवरील शौर्य नव्हे, तर विचार, कर्तव्य, त्याग, संघर्ष आणि जबाबदारी यांचीही कथा असते, हे या निर्मितींनी अधोरेखित केले. ‘आयसी ८१४ : द कंधार हायजॅक’सारख्या वेब सीरिजने दहशतवाद, अपहरण आणि राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित गुंतागुंतीचे प्रश्न पडद्यावर आणण्याचा प्रयत्न केला. अशा कथांमुळे देशभक्तीचा विषय केवळ भावनिक न राहता अधिक वास्तववादी आणि प्रश्नांकित करणारा बनत आहे.

भारतीय सिनेमातील देशभक्तीचा हा प्रवास पाहिला तर एक गोष्ट स्पष्ट होते देशभक्तीची भावना बदललेली नाही; तिची अभिव्यक्ती मात्र बदलली आहे. एकेकाळी देशभक्ती म्हणजे तिरंगा, रणांगण, सैनिकांचे बलिदान आणि शत्रूवर मिळवलेला विजय असे समीकरण होते. आज त्यात इतिहासाचे भान, मानवी नाती, नैतिक प्रश्न, राजकीय गुंतागुंत, गुप्तहेरांचे जग, राष्ट्रीय सुरक्षा आणि सामान्य माणसाचा त्याग यांची भर पडली आहे. म्हणूनच आजचा देशभक्तीपर सिनेमा केवळ ‘देशासाठी मरा’ एवढाच संदेश देत नाही; तो त्यापुढे जाऊन ‘देशासाठी जगताना आपली जबाबदारी काय?’ हा प्रश्नही प्रेक्षकांसमोर ठेवतो. हीच बदललेली भाषा आणि व्यापक दृष्टिकोन भारतीय सिनेमातील देशभक्तीला अधिक परिपक्व, संवेदनशील आणि काळाशी सुसंगत बनवत आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# आनंदी जगण्यासाठी वेळेला महत्त्व देणे गरजेचे



आपल्याकडे अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीन मूलभूत गरजा सांगितल्या जातात. या सोबतच आरोग्य, शिक्षण आणि मनोरंजनसुद्धा आपल्या गरजा असून, जीवन जगत असताना याची तीव्र निकड आपणाला असते. परंतु जीवन जगताना या गरजा पूर्ण करण्यासाठी आपणाला पैसे लागतात, म्हणून आपण पायाला भिंगरी बांधून, अनेकदा शरीराकडे, त्याच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून पैसे कमावण्याच्या मागे लागतो.

वास्तविक पाहता जीवन जगण्यासाठी इतका पैसा आपणास लागतो का? हा प्रश्न आहे. नेमके किती पैसे आपण कमावले म्हणजे आपण सुखी होऊ वगैरे कुठल्याच पुस्तकात लिहून ठेवलेले आढळत नाही. जगण्यासाठी पैसे लागतात हे मान्य, पण पैसे कमवत असताना जी शरीर संपत्ती आपणाला मिळाली आहे, त्याकडे दुर्लक्ष करून आपण ज्या धनाच्या इमारती उभ्या करण्यासाठी, आपला देह जरुरीपेक्षा जास्त झिजवत असतो, ती गोष्ट धोकादायक असते.

जगण्यासाठी किती पैसे लागतात हे माहीत नसल्याने व धनप्राप्ती करत असताना, आपली लालसा किंवा अधिक मिळवण्याची आपली हाव, आपणाला समाधान नावाच्या अमूर्त गोष्टीचा आनंद घेऊ देत नसल्याने व हे आपणाला कळत नसल्याने आपल्या उशाला बसलेला काळ नावाचा साप, जो की आपल्या जीवनातील एक एक क्षण घेऊन जात असतो. आपण आपल्या पाकिटात पै पै गोळा करून ठेवत असतो आणि हा काळ दुसरीकडे आपल्या देखत आपल्या जीवनाच्या घडीतले सेकंद, मिनिट, तास यांची पाकीट मार करत असतो, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपणाला माहीत असते की, आपले जीवन कणाकणाने संपत असून, हा काळ नावाचा साप आपल्या अमूल्य क्षणांना दररोज दंश करून ते क्षण तो आपल्या जगण्यातून घेऊन जात असतो व आपण मात्र धनप्राप्तीच्या मागे लागून आपले पाकीट जास्तीत जास्त कसे भरता येईल व ते नेहमी कसे भरून राहील याकडे लक्ष देत असतो.

आपल्याला सुखी, समाधानी जीवनासाठी लागेल तेवढेच धन प्राप्त करून, बाकीचा वेळ जीवनाचा आनंद घेण्यासाठी किंवा जीवनातून कमी होणाऱ्या क्षणाचा आनंद घेण्यासाठी राखून ठेवता येत नसल्याने आपल्या जीवनाची गाडी असंतुलित रस्त्यावरून आपण पुढे हाकत असतो व याचा परिणाम आपल्याला मिळालेले अमूल्य जीवन आपण समाधानाने जगू शकत नाही.

सतत धनाने पाकीट भरून ठेवण्याची आपली दुर्दम्य इच्छा, कधीतरी मनाने किंवा मनाप्रमाणे जगण्याच्या आपल्या आत्मिक इच्छांवर मात करते. काळ नावाचा हा पाकीट प्लेअर, आपल्या जगण्यातील अमूल्य क्षण आपल्याकडून हिसकावून घेऊन, त्याच्या पाकिटात भरून घेत असतो व आपले धनाने भरलेले पाकीट आपणाला आनंद देऊ शकत नाही किंवा आपल्याला आणखी अधिक काळ जगण्यासाठी एकही क्षण देत नाही या उगवत्या सूर्या एवढ्याच सत्याकडे आपल दुर्लक्ष होते, म्हणून काळ नावाच्या या पाकीट प्लेयरकडे वेळेतच लक्ष देऊन, आपण आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ धनाचे पाकीट भरण्यासाठी न देता मनाच्या पाकिटात, जगण्याला सुंदर बनवणाऱ्या क्षणांचा संचय केला, तर हे आनंदी जगण्यासाठी उपयुक्त क्षणांचे पाकीट आपणाला नक्कीच अमूर्त आनंद देईल.

**-अमित शिंदे**
मु. पो. रोहीपिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# प्रेमाच्या चक्रव्यूहात अडकलेली आजची पिढी

प्रेमाच्या चक्रव्यूहात कोणी फसू नये. सावधानतेनं पाऊल ठेवावे. असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. कारण दिसते तसं नसते, या वृत्तीप्रमाणे जी मंडळी वास्तविक जगतात अगदी श्रीमंत भासतात. ती मंडळी श्रीमंत असतातच असे नाही. तशीच जी मुलगी सृष्टी सौंदर्यानं नटून दिसते ती मुलगी दिसायला सुंदर असेलच असं नाही. यालाच प्रेमाचा चक्रव्यूह म्हणतात. या चक्रव्यूहात प्रत्येक प्रेम करणारा व्यक्ती फसतो व आपल्या जीवनाची राखरांगोळी करून टाकतो. ज्यात मुलंच नाही तर मुलींचाही समावेश होतो. म्हणून प्रेम करताना सावधानता बाळगून प्रेमात फसू नये म्हणजे झालं.

समाजात असेही काही घटक असतात की जे पैशावर किंवा ऐश्वर्यावर प्रेम करीत असतात. त्यांना पैसा फारच प्रिय असतो. पैशाशिवाय ते जगत नाहीत. आज शहरातील बागबगीचाचा विचार केल्यास सर्व बागबगीचे अशाच प्रकारच्या लोकांनी भरलेले असतात. जिथे प्रेमवीर सापडतात, त्यातच त्या प्रेमविरांची परिस्थिती वरवरून पाहिल्यास ते अगदी श्रीमंत वाटतात वा ते श्रीमंत असल्याचा भास होतो. कारण प्रत्येकांचे कपडे भरजरी असतात. ते गाडीवर आपल्या प्रेयसीला फिरवत असतात. त्यातच जवळ पैसा जरी नसला तरी दुसऱ्यांकडून उधार पैसे घेवून ते मोठमोठ्या हॉटेलात हॉटेलिंगही करीत असतात.

‘मी तुझ्यावर प्रेम करते’ तिचं ते म्हणणं. तसा तो अगदी श्रीमंत होता. त्यातच त्याला तिच्या स्वभावाची जाणीव होती. वाटलं की ही माझ्यावर नाही तर माझ्या पैशावर प्रेम करीत असेल. त्यानुसार त्यानं तिची परीक्षा घ्यायचं ठरवलं. ज्यात त्यानं एक मुलगा सोबत आणला. ज्याच्या अंगावर फाटके कपडे होते. त्यानंतर तो म्हणाला, हे बघ, मी यानंतर तुझ्यावर प्रेम करणार नाही. हा माझा मित्र. जसं तुझं माझ्यावर प्रेम आहे ना. मग या माझ्या मित्रावरही प्रेम कर. ते त्याचं बोलणं. त्याचं काय चुकलं होतं, ते त्यालाही कळलं नाही. कारण तिला त्यात चक्क नकार दिला. तशी ती त्याला सोडून दिली. ती त्याला सोडून गेली. त्याचं कारण त्याला समजलं नाही. परंतु त्याची दोन कारणं असू शकतात. पहिलं कारण म्हणजे तिला वाटलं असेल की तो तिची खिल्ली उडवीत आहे. तिचं ते खरं प्रेम असावं आणि दुसरं कारण फक्त तिला श्रीमंतच तरुण मंडळी आवडत असावीत की ज्यात त्यानं यानंतर मी तुझ्यावर प्रेम करणार नाही म्हटलं.

प्रेम हा काही भातुकलीचा खेळ नाही की, जे प्रेम वारंवार बदलवता येईल. काही मंडळी ही श्रीमंती, गरिबी पाहात नाहीत. ते कोणावरही प्रेम करतात. अगदी गरीब असला तरी त्याचेवरही. त्याचेच सोबत आयुष्यभर राहण्याचा विडा उचलतात. असं जर झालं नसतं तर आज गरिबांना विवाहासाठी मुलं मिळाली नसती. ते कुवारेच राहिले असते. फक्त श्रीमंतांचेच विवाह झाले असते. परंतु आजची परिस्थिती पाहता प्रत्येक मुलींना प्रेम करण्यासाठी श्रीमंतच मुलं हवी की जो भेटायला येतांना सजूनधजून येतो. जो बाईकवर येतो. ज्याची बाईकही अति सुंदर स्वरुपाची अर्थात बुलेट आहे. जो बारीक जरी असला आणि त्या गाडीवर बसण्यालायक शोभत जरी नसला तरी चालते. फक्त बुलेट पाहिजे. जो एखाद्या फाईव्ह स्टार हॉटेलात नाश्ता करवतो. त्या मुली त्याचं घर कसं आहे? तो स्वभावानं कसा आहे? त्याच्या घरची माणसं स्वभावानं कशी आहेत? तो प्रेम करण्यायोग्य आहे किंवा नाही? या गोष्टीचं त्याला काही लेनदेण नसतं. फक्त पैसा व शानशौक त्या मुलींना महत्वपूर्ण वाटतात. याऊलट एखादा मुलगा जर फाटक्या वस्त्रात असेल आणि त्याला एखादी मुलगी आवडत असेल आणि त्यानं जर तिला प्रपोज केलं तर मुली त्याचेवर प्रेम करीत नाहीत. तसंच मायबापाचंही आहे. प्रत्येक आईवडील आपल्या मुलीचा विवाह करतांना त्या मुलाचा स्वभाव लक्षात घेत नाहीत. फक्त त्याची श्रीमंती लक्षात घेतात. मग फसतात. कारण प्रत्येक श्रीमंत मुलं ही काही चांगल्या स्वभावाची नसतात. ते कधी व्यसनाधीनही निघतात, यात शंका नाही.

एक आणखी प्रसंग. ज्यात एका व्यक्तीनं विवाहासाठी एक नाते आणले. मुलगा हा इंजीनियर झालेला व स्वभावानं चांगला. परंतु झोपडपट्टीत राहणारा. अशा मुलाला त्या मुलीच्या आईनं चक्क नकार दिला. कारण होतं झोपडपट्टीत असलेला त्याचा निवास. याचाच अर्थ असाच की बऱ्याच लोकांना झोपडपट्टीत निवास करणारी, गरीब असणारी, जवळ शानबाज गाडी नसणारी व फाईव्ह स्टार हॉटेलात नाश्ता न करवणारी मुलं विवाह करण्यासाठी वा प्रेम करण्यासाठी आवडत नाहीत तर याऊलट लोकं आवडतात.

प्रेम...अलीकडील काळात मुलांना प्रेम करण्यासाठी म्हणतात की वेळ, काळ लागत नाही. रुप लागत नाही. फक्त लागतो तो पैसा. जो मुलगा शान बादशाहाची व दुकान फुटाण्यागत असल्यासारखे वागतात वा पैसा झळकवतात. अर्थातच मुली त्याचेवरच भाळतात. परंतु त्या विचार करीत नाहीत की हा वरवर श्रीमंत वाटणारा मुलगा एक ना एक दिवस आपल्याला नक्कीच फसवेल. जो म्हणेल की मला तू आवडत नाईमहीस. मी तुला आज सोडून जाणार. तसंच एखादा गरीब मुलगा उभे करुन म्हणतील की तू यानंतर या मुलांवर प्रेम कर.

प्रेम...प्रेम ही काय कुणाच्या बापाची वा बापजादाची जहांगीर आहे काय की कुणावरही प्रेम करता येईल वा एखाद्यानं म्हटलं की अमूक अमूक व्यक्तीवर प्रेम कर तर प्रेम करता येईल. निदान प्रेमात तरी तसं होत नाही. प्रेम हे कोणी कितीही म्हटलं तरी कुणावरही होत नाही. जे खरं प्रेम असेल. खोटं व फसवं प्रेम हे अगदी याउलट आहे. ते प्रेम फक्त श्रीमंत व्यक्ती पाहून होतं. तसेच जे श्रीमंत नसतात. ज्यांच्या घरात खायलाही व्यवस्थित मिळत नाही. जे उधारीच्या पैशावर आपल्या प्रेयसीला फिरवतात. ज्यांचा स्वभाव माहित नसतोच. अशांवर प्रेम करणं म्हणजे फसवं प्रेम असतं. मात्र मुली अशांवरच प्रेम करतात व फसतात.

प्रेमाचं हे चक्रव्यूह. या चक्रव्यूहात फक्त मुलीच फसतात असं नाही. काही मुलंही फसतात. कारण मुली जेव्हा मुलांना भेटायला येतात. तेव्हा त्या अगदी नटूनथटून येतात. ज्यात तिनं केलेल्या मेकअपच्या आड तिचं सौंदर्य लपलेलं असतं. ती मेकअपनं गोरीपान व चांगली दिसते. परंतु मेकअप उतरताच तिचं खरं सौंदर्य उघडकीस येतं. परंतु ते खऱ्या स्वरुपाचं सौंदर्य कोणत्याही मुलाला दिसत नाही.

मुलींचं सौंदर्य. मुली असं जोरदार मेकअप करतात की त्या मेकअपवरुन वाटतं की त्या मुली बहुतांश अगदी श्रीमंत घरच्याच असाव्यात. परंतु त्यांचीही वास्तविक परिस्थिती पाहिली तर असं जाणवतं की काही काही मुलींना धडाचे चांगले कपडेही घालायला मिळत नाहीत. त्या मुली टिन पत्र्याच्याच घरात राहातात आणि श्रीमंत मुलांना लुटण्यासाठी आपल्या मेकअपवर पैसा खर्च करतात. ज्यातून त्यांना अशा श्रीमंत तरुणांनी पसंत केल्यास नाश्तापाणी, पैसे आडके व कधी कपडेही मिळतात. शिवाय चांगल्या बाईकवर फिरायलाही मिळते. त्यातच वेगवेगळे प्रेक्षणीय स्थळही पाहायला मिळतं.

प्रेम...प्रेमातून बराच लाभ होत असतो. आत्मिक समाधान लाभत असते. परंतु हे जरी खरं असलं तरी अलिकडील प्रेमात काही मुली श्रीमंतांना फसवतांना दिसतात. त्या मुली आपले प्रियकरासोबतचे अश्लील व्हिडिओ काढून घेतात. त्यानंतर मुलांना ब्लॅकमेल करुन पैसा उकळत असतात. तशीच काही मुलंही आहेत. ती मुलंदेखील मुलींचे अश्लील व्हीडीओ काढून घेतात. त्यानंतर तिला ब्लॅकमेल करीत असतात. महत्वपूर्ण बाब ही की आजचे प्रेम हे असेच फसवे असून त्यालाच प्रेमाचा चक्रव्यूह म्हणतात. अशा चक्रव्यूहात जाणं तर सोपं आहे. परंतु त्यातून निघणं कठीण. ते एखाद्याच निष्णांत असलेल्या व प्रेम करणाऱ्या अर्जुनाला जमतं. सर्वांनाच जमत नाही. कारण सर्वांची गत ही अभिमन्यूसारखी होते. जसं अभिमन्यूला गर्भातच चक्रव्यूह भेदण्याचं शिक्षण मिळालेलं होतं. त्यामुळं तो चक्रव्यूहात शिरलाही. परंतु कौरवांनी आखलेल्या चक्रव्यूहातून तो बाहेर पडू शकला नाही. ज्यात त्याचा अंत झाला. तीच गत प्रेमविरांची होते. प्रेमवीरही असेच अभिमन्यूसारखे चक्रव्यूहात अडकतात. ज्यातून कौरवरुपी गैरफायदा घेणारे डोमकावळे अशाच प्रेमवीर समजणाऱ्या खऱ्या प्रेमविरांचे लचके तोडायलाही मागेपुढे पाहात नाहीत. म्हणूनच आजच्या काळात प्रेम करतांना ज्यांना जरा सावधानतेनं प्रेम करावं. तसंच त्यानंच प्रेम करावं, ज्याला खरंच अर्जुनासारखं चक्रव्यूह भेदण्याचं वा त्यातून बाहेर पडण्याचं ज्ञान आहे. अर्धवट प्रेमाचं चक्रव्यूह भेदण्याचं व त्यातून बाहेर पडण्याचं ज्ञान नसणाऱ्यांनी अशा प्रेमाच्या चक्रव्यूहात पडूच नये. कारण त्यातून आपलीच अधोगती होते. माणूसपण हरवतं नव्हे तर त्यातूनच आपलीच बदनामी होवून आपल्याला प्रसंगी बदनामीच्या धाकानं आत्महत्याही करावी लागते. कारण उपाय निघत नाही. असं होवू नये म्हणून प्रेमाच्या चक्रव्यूहात कोणी फसू नये म्हणजे झालं. सावधान राहावं. हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# इतिहासातील चुकांमधून धडा घेतल्यास भविष्यकाळ उज्ज्वल -प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे




**नांदेड (प्रतिनिधी)–** वर्तमानकाळातील वाटचालीसाठी इतिहास मार्गदर्शक ठरत असतो. भूतकाळामध्ये घडलेल्या चुका इतिहासाच्या अभ्यासातून टाळता येतात. त्या टाळल्या तर भविष्यकाळ उज्ज्वल ठरतो, असे उद्गार महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील सेवानिवृत्त प्राचार्य तथा ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ.सोमनाथ रोडे यांनी यशवंत महाविद्यालयातील इतिहास विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने सत्रारंभ कार्यक्रमामध्ये 'इतिहास विषयातील करिअर व संधी' या विषयावर साधनव्यक्ती तथा प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना प्रतिपादन केले.

अध्यक्षस्थानी माजी प्र-कुलगुरू तथा प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे होते. यशवंत महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना इतिहास विषयातील अध्ययनाच्या विविध पैलूंबरोबरच उच्च शिक्षण, संशोधन व रोजगाराच्या उपलब्ध संधींची माहिती व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पुढे बोलताना डॉ. सोमनाथ रोडे म्हणाले की, इतिहास हा विषय शालेय स्तरापासून शिकवला जात असल्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात व तसेच संशोधनाच्या क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. तसेच इतिहासात केवळ भूतकाळाचा अभ्यास करणारा विषय नसून त्यामध्ये विविध क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी, इतिहास विषयाचे स्पर्धा परीक्षेमध्ये असलेले महत्त्व अधोरेखित करत इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी इतिहासातील मूळ ग्रंथांचे वाचन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच स्पर्धा परीक्षेसाठी इतिहास हा विषय निवडून अनेक विद्यार्थी मोठ्या पदावर गेले आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासांती स्पर्धा परीक्षेला सामोरे गेल्यास मोठे अधिकारपद प्राप्त होऊ शकते.

प्रारंभी प्रास्ताविकात इतिहास विभागप्रमुख डॉ. शिवराज बोकडे यांनी इतिहास विभागाच्या शैक्षणिक, संशोधनात्मक व विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची माहिती देत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

डॉ. संगीता शिंदे (ढेंगळे) यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. साईनाथ बिंदगे यांनी केले, तर प्रा. राजश्री भोपाळे यांनी आभार मानले.

याप्रसंगी डॉ. शीतल सावंत यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अजय गव्हाणे, संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, जगन्नाथ महामुने, नाना शिंदे यांनी सहकार्य केले.

## महसूल दिनी कर्मचाऱ्यांचा होणार सन्मान

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** कै. शंकरराव चव्हाण सभागृह, नांदेड येथे महसूल दिनानिमित्त सन २०२५-२६ या वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमात अर्धापूर तहसील कार्यालयांतर्गत उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी दाभड सज्जाचे मंडळ अधिकारी राजु इंगळे, लहान येथील पोलीस पाटील आनंद इंगळे व कोतवाल अंकूश पन्नासे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

गेल्या वर्षभरात महसूल विषयक कामांमध्ये दाखवलेली तत्परता, पारदर्शकता, जनसेवेची भावना तसेच शासकीय कामातील अचूकता याबद्दल महसूल विभागाच्या वतीने मंडळ अधिकारी राजु इंगळे, पोलीस पाटील आनंद इंगळे व कोतवाल अंकूश पन्नासे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी पोलिस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील,अप्पर जिल्हाधिकारी रत्नदिप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर,उपविभागीय अधिकारी डॉ.संजय खल्लाळ,तहसीलदार रेणूकादास देवणीकर आदींची यावेळी उपस्थिती होती.

## बीबीएनएच्या 'श्रावण उत्सव -२०२६' चा उत्साहात शुभारंभ; स्वदेशी, स्वावलंबन आणि संस्कृतीचा जागर



**नांदेड (प्रतिनिधी)–** बीबीएनए असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'श्रावण उत्सव २०२६' चा शुभारंभ भाजपाच्या युवा नगरसेविका शांभवी साले यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात झाला. शांभवी साले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर वेदोक्तशास्त्र पारंगत पुरोहितांनी शांतिपाठाचे पठण करून कार्यक्रमाला आध्यात्मिक वातावरणाची जोड दिली.

यावेळी सौ. संगीता देशपांडे यांनी शांभवी साले यांचे स्वागत केले, तर सौ. श्रावणी पाठक यांनी त्यांचा परिचय करून दिला. उद्घाटनपर भाषणात शांभवी साले यांनी बीबीएनए असोसिएशनच्या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. स्वदेशी, स्वावलंबन आणि संस्कृती या तीन मूल्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित होत असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या या विचारांशी श्रावण उत्सवाची संकल्पना सुसंगत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी रश्मीताई वडवळकर, अर्चना राजूरकर, संगीता देशपांडे, पुष्पा कोकीळ, सुनील भरड, महेश कोळेश्वर यांची उपस्थिती होती.

श्रावण महिन्याच्या पार्श्व-भूमीवर आयोजित या उत्सवात विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, पूजा साहित्य, पारंपरिक वस्तू, कपडे, इमिटेशन ज्वेलरी तसेच अन्य आकर्षक वस्तूंचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना सणासुदीच्या खरेदीसोबतच स्थानिक व्यावसायिक आणि महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्याची संधी मिळणार आहे. स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि व्यावसायिकांना ग्राहकांशी थेट संवाद साधता यावा, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे.

श्रावण उत्सवाच्या माध्यमातून व्यवसाय, संस्कृती आणि सामाजिक सहभाग यांचा सुंदर संगम साधण्याचा प्रयत्न बीबीएनए असोसिएशनने केला आहे. उत्सवाच्या माध्यमातून नांदेडकरांना रविवारी सुद्धा सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत एकाच ठिकाणी विविध वस्तू आणि खाद्यपदार्थ उपलब्ध होणार असून, श्रावणातील उत्सवी वातावरणाचा आनंदही घेता येणार आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश राजूरकर यांनी केले, तर सौ. रश्मी वडवळकर यांनी आभार मानले.

## सुजलेगावात संवाद बैठक व आरोग्य तपासणी शिबीर

### एकल महिलांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी 'रयत'चा पुढाकार



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी रयत सेवाभावी संस्था, नांदेड व कोरो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने सुजलेगाव तालुका नायगाव येथील हनुमान मंदिरात संवाद बैठक व आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कोरो इंडियाचे मराठवाडा समन्वयक लक्ष्मण हजारे यांनी एकल महिलांच्या समस्या, हक्क तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. नायगाव महिला व बाल विकास प्रकल्पाच्या पर्यवेक्षिका कबीर मॅडम यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले.

रयत सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. इरवंत सूर्यकार यांनी एकल महिलांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. सपना टोमके यांनी सुजलेगावातील एकल, घटस्फोटित व कुमारिका महिलांचे सर्वेक्षण करून आवश्यक कागदपत्रे संकलित केली जात असून, ती तलाठी व ग्रामसेवक कार्यालयाकडे सादर करण्यात येत असल्याची माहिती दिली.

दरम्यान, डॉ. लोखंडे व आरोग्य विभागाच्या पथकाने महिलांची आरोग्य तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. यावेळी माधव पवार, रमेश सूर्यकार, भास्कर कदम यांच्यासह आशा वर्कर, अंगणवाडी कार्यकर्त्या आणि एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जागतिक आदिवासी दिनानिमित्त विद्यार्थ्यांची शोभायात्रा; पारंपरिक वेशभूषेतून सामाजिक एकतेचा संदेश

### गोदावरी मनार पब्लिक स्कूलमध्ये आदिवासी संस्कृतीचा जागर



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा आणि निसर्गाशी असलेले अतूट नाते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने बिलोली तालुक्यातील गोदावरी मनार पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज, शंकरनगर येथे जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात आणि विविधांगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य डी. पी. पांडेय होते. त्यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती माता तसेच क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून शाळेपासून रामतीर्थ मार्गे शंकरनगर बसस्थानकापर्यंत विद्यार्थ्यांची शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेल्या पारंपरिक आदिवासी वेशभूषा व केशभूषा.

विविध पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविले. या माध्यमातून सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच सामाजिक एकता, निसर्ग संवर्धन आणि आदिवासी समाजाच्या परंपरांचा सन्मान करण्याचा संदेश देण्यात आला.

दिवसभराच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सांस्कृतिक स्पर्धा, गायन, वक्तृत्व, नृत्य, आदिवासी नृत्य, कोळी नृत्य, चित्रकला आणि एकांकिका आदी स्पर्धांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डी. पी. पांडेय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आदिवासी समाजाचे निसर्गाशी असलेले नाते अत्यंत जवळचे आहे. निसर्गाचे संवर्धन, सामूहिक जीवनपद्धती, एकोपा आणि परंपरांचे जतन या बाबतीत आदिवासी समाजाकडून प्रत्येकाने प्रेरणा घेणे आवश्यक आहे.

आदिवासी समाज हा निसर्गपूजक असून, निसर्गाचे जतन करण्याची परंपरा त्यांनी आजही कायम ठेवली आहे. समाजातील एकोपा आणि एकीच्या बळाची भावना ही त्यांच्या जीवनपद्धतीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांनी आदिवासी समाजातील चांगल्या मूल्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवनात पुढे जावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमास पालक, विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजली इंगळे व सुहाना पठाण यांनी केले तर एन. आर. मुसांडे यांनी आभार मानले.

## राज्य पुरस्कृत योजनेतून अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशातील विकसित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती आणि क्षमता उंचावण्यासाठी कृषी विभागाकडून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे सन २०२६-२७ ही योजना राबविण्यात येत आहे. परदेश अभ्यास दौऱ्याकरिता इच्छुक असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांनी आपले अर्ज व प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह तात्काळ आपल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपर्क साधून सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

देशातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून तसेच क्षेत्रीय भेटी, संबंधित संस्थाना भेटी इत्यादीद्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्यासाठी कृषी विभागाकडून राज्य पुरस्कृत योजना २०२६-२७ राबविण्यात येत आहे.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात १० ऑगस्ट चे ६ वाजेपासून ते २४ ऑगस्ट २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १० ऑगस्टचे ६ वाजेपासून ते २४ ऑगस्ट २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

## शिवाजीराजे पाटील उलगडणार 'सक्सेसचा पासवर्ड' : ३० ऑगस्टला 'एसडीपी'चे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय ख्यातीचे माईंड पॉवर ट्रेनर तथा विश्वप्रसिद्ध लाईफ स्किल कोच इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांच्या प्रेरणादायी (एसडीपी) 'स्टुडंट डेव्हलपमेंट प्रोग्राम'चे आयोजन रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी एमईएस हायस्कूलच्या ऑडिटोरियममध्ये करण्यात आले आहे.



या कार्यक्रमात दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रभावी प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. पल्लवी देशमुख यांनी दिली.

या विशेष प्रशिक्षण शिबिरात 'पॉवर ऑफ सबकॉन्शियस माईंड, प्रभावी संभाषण कौशल्य, नेतृत्व विकास, लेखन कौशल्य, वाचनसंस्कृती, आनंदी व निकोप मैत्रीभाव' आदी विषयांवर शिवाजीराजे पाटील यांचे सखोल मार्गदर्शन होणार आहे. अभ्यासातील गुणवत्ता वाढविण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सकारात्मक विचारसरणी आणि यशस्वी व्यक्तिमत्त्व घडविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

याशिवाय टाईम मॅनेजमेंट, स्वयंशिस्त, चारित्र्य संवर्धन, जीवनमूल्ये आणि ध्येयपूर्तीसाठी आवश्यक मानसिक तयारी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही शिवाजीराजे पाटील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. त्यांचे ऊर्जावान, प्रेरणादायी आणि अनुभवसंपन्न मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

युवाप्रेरणास्त्रोत शिवाजीराजे पाटील यांच्या अनोख्या व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. संयुक्ता नरवाडे, प्रा. वैशाली पाटील, डॉ. संतोष झनक आणि प्रा. नितीन अडकिणे यांनी केले आहे.

## विष्णुपुरीचे ग्रामविकास अधिकारी रमेश गिरी यांनी आदर्श ग्रामविकास अधिकारी पुरस्कार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड दक्षिण तालुक्यातील विष्णुपुरीचे ग्रामविकास अधिकारी रमेश गिरी यांनी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना उत्कृष्ट ग्रामविकास अधिकारी पुरस्कार कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र व शाल, श्रीफळ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.

नांदेड तहसील कार्यालयाच्या वतीने १ ऑगस्ट रोजी महसूल दिनाचे औचित्य साधून उपविभागीय अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्रामविकास अधिकारी यांच्यासह कार्यालयीन लिपीक व विविध विभागातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्याचा सत्कार करण्यात आला.

## नगरसेविका सुवर्णा सतीश बस्वदे यांची भाजप महिला मोर्चाच्या महानगर जिल्हा सरचिटणीसपदी निवड




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी आणि महिलांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी प्रभाग क्रमांक २० सिडकोच्या नगरसेविका सौ. सुवर्णा सतीश बस्वदे यांची भाजप महिला मोर्चाच्या महानगर जिल्हा सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते आणि भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजया चव्हाण, भाजपा महानगराध्यक्ष आ. अमर राजूरकर, महापौर कविता मुळे तसेच भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा ज्योतीताई कल्याणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सौ. सुवर्णा बस्वदे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

नगरसेविका म्हणून प्रभागात केलेल्या कामांची आणि महिला सक्षमीकरणासाठी राबवलेल्या उपक्रमांची दखल घेत पक्षाने त्यांच्यावरही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

आपल्या निवडीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सौ. सुवर्णा बस्वदे म्हणाल्या, वरिष्ठ नेत्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास निश्चितच सार्थ ठरवेन. आगामी काळात शहरातील महिलांचे संघटन अधिक मजबूत करून केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी मनापासून काम करेन. असे सांगितले.

या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांसह प्रभाग क्र. २० मधील नागरिकांनी सौ. सुवर्णा बस्वदे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


**पाहिजेत**

**पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक भरती जाहिरात - २०२६**

संस्था कोड 271507SC028

**प्रगती शैक्षणिक प्रतिष्ठाण देगलूर ता.देगलूर जि.नांदेड व्दारा संचलित**

**प्रगती माध्यमिक विद्यालय,सुगांव ता.देगलूर जि.नांदेड**

| अ.क्र. | पद व इयत्ता | वेतन श्रेणी | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | विषय | पद संख्या | अनुदार प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक इयत्ता ६ ते ८ वी | १६,०००/- | बी.ए., बी.एड | मराठी, इतिहास | १ | १०० टक्के |
| २ | शिक्षण सेवक इयत्ता ९ ते १० वी | १८,०००/- | बी.ए., बी.एड | इंग्रजी, भुगोल | १ | १०० टक्के |

वरील पदाचे आरक्षण विजा-अ,इ.मा.व. या प्रमाणे राखीव असून पात्र उमेदवारा व महिलांना प्राधान्य देण्यात येईल. आरक्षणानुसार पात्र उमेदवारांनी http://tait2026mahateacherrecuritment.org.in या सकित स्थळावर ऑनलाईन संस्था कोड 271507SC028 या क्रमांकावर प्राधान्य क्रम नमुद करावे. वरील शिक्षक भरती शासनाच्या वेळोवेळी निर्गीमत होणाऱ्या नियमाच्या अधीन राहील.

स्वाक्षरीत /-

अध्यक्ष सचिव


प्रगती शैक्षणिक प्रतिष्ठाण देगलूर ता.देगलूर जि.नांदेड

मो.9860250100,9637370700

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

## विद्राव्य खतांचा योग्य पद्धतीने वापर




**पिकांचे अधिक उत्पादन घेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व निविष्ठांमध्ये पाणी आणि खते या दोन अत्यंत महत्त्वाच्या निविष्ठा आहेत. दोन्ही निविष्ठांचा पारंपरिक पद्धतीने वापर करत असताना त्याची कार्यक्षमता फक्त ३० ते ४० टक्के मिळते. दोन्ही निविष्ठांचा ठिबक सिंचन पद्धतीमधून वापर केल्याने त्यांची कार्यक्षमता ८० ते ९० टक्के मिळते. त्यामुळे पिकाचे अधिक उत्पादन तर मिळतेच आणि उच्चतम गुणवत्ता मिळते. त्याच बरोबर दोन्ही निविष्ठांच्या वापरामध्ये अनुक्रमे ५० ते ६० आणि २५ ते ३० टक्के बचत होऊन खर्चामध्ये बचत होते.**

विद्राव्य खतांच्या मात्रा ठरविण्यापूर्वी माती परीक्षण होणे आवश्यक आहे. आपल्या जमिनीचा सामू, विद्युत वाहकता तसेच जमिनीत उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश, सूक्ष्म अन्नद्रव्ये किती आहेत हे लक्षात येते. त्यानुसार विद्राव्य खतांची मात्रा ठरविता येते. विद्राव्य खतांचा वापर शिफारशीनुसार आवश्यक आहे. जमिनीत निंबोळी पेंड, शेणखत आणि गांडूळ खताचा वापर करावा. फर्टिगेशनमध्ये अन्नद्रव्यांची मात्रा ठरवताना माती परिक्षणाचा अहवाल तपासावा. आपणास किती टन किंवा क्विंटल पीक उत्पादन घ्यावयाचे आहे आणि त्यासाठी किती अन्नद्रव्ये पिके जमिनीतून शोषण करतात, यानुसार किंवा स्थानिक कृषी विद्यापीठाच्या संबंधित पिकाच्या शिफारशीनुसार अन्नद्रव्यांची मात्रा ठरवावी. फर्टिगेशन करत असताना पिकाच्या अवस्थेनुसार त्वरित बदल करावेत.

### फर्टिगेशन तंत्राचा वापर

फर्टिगेशन तंत्रामुळे २५ ते ३० टक्के रासायनिक खतांच्या वापरामध्ये बचत होते. पाण्यात विरघळणारी खते ठिबक सिंचनासोबत वापरल्यास खत वापर कार्यक्षमता ८० टक्क्यांपेक्षा अधिक मिळते. राज्यात द्राक्ष, हरितगृहातील गुलाब, कार्नेशन, जरबेरा, टोमॅटो, ढोबळी मिरचीसाठी पूर्णपणे फर्टिगेशनचा वापर होत आहे. तर डाळिंब, केळी, मोसंबी, संत्रा, पेरू, पपई, ऊस, कापूस पिकांसाठी निम्मे पारंपरिक आणि निम्मे विद्राव्य खतांचा वापर शेतकरी करीत आहे. ठिबकने पाणी देताना पाण्यात विरघळणारी खते दिली पाहिजेत. ठिबक सिंचन हे केवळ फक्त पाणी देण्यासाठी नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

### आवश्यक अन्नद्रव्ये

- मुख्य अन्नद्रव्ये : कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन, नत्र, स्फुरद, पालाश
- दुय्यम अन्नद्रव्ये : कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, सल्फर
- सूक्ष्म अन्नद्रव्ये : कॉपर, मँगेनीज, झिंक, लोह, बोरॉन,क्लोरिन, मॉलिब्डेनम, सिलिकॉन

### फवारणी करताना...

पिकास कोणत्या अन्नद्रव्यांची उणीव आहे, अशाच विद्राव्य खतांची निवड करून त्याची फवारणी करावी. उत्तम वाढीसाठी १९:१९:१९ विद्राव्य खताची फवारणी करावी. फुले भरपूर येण्याकरिता १३:४०:१३ ची फवारणी करावी, फळांची, बोंडांची चांगली वाढ होण्यासाठी ०:५२:३४ ची फवारणी करावी. फळे, बोंडे परिपक्व होताना १३:०:४५ ची फवारणी करावी.

### विद्राव्य खताचे फायदे

१०० टक्के पाण्यात विद्राव्य असल्यामुळे आणि त्यातील अन्नद्रव्ये उपलब्ध स्वरूपात असल्यामुळे पिकांस लगेच उपलब्ध होतात. निर्यातक्षम गुणवत्तेचे अधिक उत्पादन मिळते. पिकांना पाणी आणि अन्नद्रव्यांचा नियमित पुरवठा होत असल्यामुळे उत्पादनात भरीव वाढ होते. पिकांच्या गरजेनुसार व अवस्थेनुसार दररोज अथवा दिवसाआड देता येतात. थेट पिकांच्या मुळांच्या कक्षेत दिली जातात, ती मुळांना त्वरित उपलब्ध होतात. खते सौम्य द्रावणातून दिली जात असल्यामुळे मुळावर अनिष्ट परिणाम होत नाही. खते देण्याची पद्धत अतिशय सोपी असल्यामुळे वेळ, मजूर, खर्च,



ऊर्जा, यंत्रसामग्रीची बचत होते. खते रोज कमी मात्रेत दिली जात असल्यामुळे अन्नद्रव्ये निचऱ्यावाटे, स्थिरीकरणाद्वारे वाया जात नाहीत. खते आम्लधर्मीय असल्यामुळे जमिनीचा सामू नियंत्रण करण्यास मदत होते. ठिबक संचात क्षार साचत नाहीत. ड्रीपर्स बंद पडत नाहीत. खतांच्या मात्रेमध्ये २५ टक्के बचत होते. सोडियम क्लोराइड्स सारख्या हानिकारक मुलद्रव्यापासून मुक्त असल्यामुळे जमिनीच्या पोताचा ऱ्हास होत नाही. तसेच उत्पादनाची गुणवत्ता अप्रतिम राहते. खते फवारणीसाठी वापरता येऊ शकतात. हलक्या जमिनीतही फर्टिगेशनद्वारे अधिक उत्पादन मिळविणे शक्य होते.

### विद्राव्य खते द्यायची साधने

- ठिबक सिंचन पद्धतीमध्ये व्हेंचुरी किंवा फर्टिलायझर टँक किंवा इंजेक्शन पंपाव्दारे विद्राव्य खतांचा वापर करता येतो.
- व्हेंचुरी : हे पाण्याचा दाबामधील फरकावर चालणारे साधन आहे. व्हेंचुरीद्वारे विद्राव्य खते पाण्याच्या प्रवाहाबरोबर झाडांच्या मुळांच्या कक्षेत दिली जातात. व्हेंच्युरीच्या शोषणाचा दर १२० ते १५०० लिटर प्रती तास असतो. मुख्य वाहिनीवरील व्हॉल्व्हद्वारे कमी जास्त करता येतो. व्हेंचुरी १.०, १.५, २.०, २.५ इंच आकारामध्ये उपलब्ध आहेत.
- फर्टिलायझर टँक : ही एक स्टीलची टाकी किंवा एचडीपीई प्लॅस्टिकची असून मुख्य जलवाहिनीस इनलेट व आऊटलेट जोडलेले असते. खतांचे प्रमाण सिंचनाबरोबरच पिकांना दिले जाते. टँक ३०, ६०, ९०, १२०, १६० लिटरमध्ये उपलब्ध आहेत.

### ठिबक सिंचनासोबत वापरण्यात येणारी खते

- ०:५२:३४ मोनो पोटॅशिअम फॉस्फेट
- १७:४४:०० युरिया फॉस्फेट
- १३:००:४५ पोटॅशिअम नायट्रेट
- १२:६१:०० मोनो अमोनिअम फॉस्फेट
- १९:१९:१९ सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त
- १३:४०:१३ सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त
- १६:०८:२४ सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त
- ०:०:५० सल्फेट ऑफ पोटॅश
- ४६:०:० युरिया
- २०:०:० अमोनिअम सल्फेट
- ०:०:६० म्युरेट ऑफ पोटॅश
- ०:५२:० फॉस्फोरिक ॲसिड

ही सर्व खते पाण्यात संपूर्णपणे विरघळणारी आहेत. यातील अन्नद्रव्ये सहज व त्वरित उपलब्ध होतात. यांचा ठिबक सिंचन पद्धतीमधून सहज वापर करता येतो.

### फर्टिगेशन करताना घ्यावयाची काळजी

विद्राव्य खते ही ठिबक सिंचनाद्वारे द्यावयाची असल्यामुळे ठिबक सिंचन काळजीपूर्वक देखभाल करणे हे महत्त्वाचे ठरते. सर्वप्रथम ठिबक सिंचन संचातील फिल्टर्स (सँड फिल्टर, स्क्रीन फिल्टर) मेन लाइन, सबमेन लाइन, लॅटरल, फिटिंग्ज, व्हॉल्व्ह व फ्लश व्हॉल्व्ह इत्यादी ठिकाणाहून होणारी गळती पूर्णपणे बंद कराव्यात. ऑनलाइन ड्रीपर्स वापर करीत असल्यास शेतातील सर्व ड्रीपर्समध्ये चकत्या आहेत किंवा नाही हे तपासून घ्यावे. जर चकत्या नसतील तर योग्य चकत्या टाकून ड्रीपर्स पूर्ववत करून घ्यावे. जर ड्रीपर्स जवळ गळती असेल तर ते सुद्धा बंद करावे. पिकांसाठी इनलाइन किंवा ऑनलाइन ठिबकमधून सर्व ठिकाणी सारखे पाणी मिळते की नाही ते बघावे. फिल्टर जवळ १.५ ते २ कि. चौ. सें. मी. आणि सबमेनच्या शेवटी १.०० कि/ चौ. सें. मी. दाब असावा. तसेच ड्रीपर्सचे झाडापासून अंतर योग्य आहे किंवा नाही ते वारंवार निरीक्षण करीत राहावे. खते आणि पाणी पांढऱ्या मुळांच्या क्षेत्रातच द्यावे. साधारणतः जमीन ही रोज वाफसा अवस्थेत राहील एवढेच पाणी झाडांना दिले पाहिजे. विद्राव्य खतांचा वापर एकूण सिंचनाच्या कालावधीच्या मधल्या कालावधीत करावयाचा असतो. समजा, आपण १२० मिनिटे ठिबक सिंचन संच चालवीत असल्यास ८० मिनिटे ठिबक सिंचन संचाव्दारे फक्त पाणी द्यावे. नंतर ३० मिनिटे विद्राव्य खते ठिबक सिंचनाद्वारे द्यावे. त्यानंतर ५ ते १० मिनिटे पुन्हा पाणी द्यावे. शेवटी पाणी एवढ्यासाठी द्यावे की जेणेकरून ठिबक सिंचन संचात खते साचून न राहता खतांची संपूर्ण मात्रा झाडांच्या मुळापर्यंत पोहोचेल. ठिबकमधून पाण्यासोबत खते सोडल्यानंतर खूप जास्त वेळ ठिबकने पाणी देऊ नये. अन्यथा दिलेली खते पाण्यासोबत झिरपून जातील. ठिबक सिंचनासोबत रासायनिक खतांचा वापर करताना ती पाण्यात संपूर्णपणे विरघळणारी असावीत. सर्व प्रथम द्यावयाची खते पाण्यात संपूर्णपणे विरघळून द्यावी. खते फर्टिलायझर टँकमध्ये टाकू नयेत. खताच्या मात्रेमध्ये युरिया, १९:१९:१९, १२:६१:०, १३:०:४५, ०:०:५० वापरायचे असल्यास प्रथम १२:६१:०, ०:०:५०, १३:०:४५ पाण्यात संपूर्णपणे विरघळल्यानंतर १९:१९:१९ आणि शेवटी युरिया पाण्यात विरघळून घ्यावा. सर्वांत प्रथम युरिया विरघळल्यास पाणी थंड होते आणि नंतर टाकलेली खते पाण्यात विरघळल्यास वेळ लागतो. स्फुरदयुक्त खते उदा. १२:६१:०, ०:५२:३४ सोबत कॅल्शिअम नायट्रेट विरघळू नये, कारण तसे केल्यास साका तयार होतो. कॅल्शिअम नायट्रेट सोबत ०:०:५० पाण्यात एकत्र विरघळू नये. पोटॅश वापरताना फक्त पांढरा पोटॅश पाण्यात पूर्णपणे विरघळतो. लाल पोटॅश पाण्यात पूर्णपणे विरघळत नाही. म्हणून फक्त पांढरा पोटॅश वापरावे. रासायनिक खतांची पाण्यात विरघळण्याचे प्रमाण पाण्याच्या तापमानावर अवलंबून असते. पाणी जास्त थंड असल्यास खते कमी विरघळतात. फर्टिगेशन (ठिबक सिंचनमधून खते) नेहमी दुपारी/सायंकाळी करावे, पाणी कोमट असल्यास खते चांगली विरघळतात. जमिनीत तापमान योग्य असल्याने अन्नद्रव्यांचे शोषण चांगले होते.




## तणनाशकांचा सुरक्षित वापर महत्त्वाचा...

**कोणत्याही पिकामध्ये तणाचे नियंत्रण हे एक मोठे काम असते. खुरपणीसाठी मजुरांची उपलब्धताच होत नसल्याने शेतकरी सर्वसामान्यपणे पारंपरिक कोळपणी, निंदणी, उन्हाळी नांगरटी व अशा इतर मशागतीय पद्धतीने तणनियंत्रण करत असतो. मात्र या परंपरागत पद्धतीने तण व्यवस्थापन पूर्णतः शक्य होत नाही. परिणामी, सध्या शेतकऱ्यांचा कल रासायनिक तणनाशकांच्या वापराकडे वळला आहे. ते शेतकऱ्यांना सोईस्करही ठरत असल्याने त्याचे प्रमाण गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने वाढत आहे.**



### आवश्यक अन्नद्रव्ये

राज्यामध्ये बहुतांश सर्व पिकांमध्ये तणनाशकांची वापर वाढत असून, त्यांच्या सुरक्षित वापराच्या दृष्टीने अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तणनाशकांचा योग्य पद्धतीने व शिफारशीत योग्य मात्रेत वापर करणे गरजेचे असते. शिफारशीपेक्षा कमी प्रमाणात वापर केल्यास तणांचे योग्य नियंत्रण मिळत नाही. शिफारशीपेक्षा जास्त प्रमाणात वापर केल्यास पिकांना इजा होणे, तणनाशकांचे अवशेष जमिनीमध्ये दीर्घकाळ राहणे या समस्या उद्‌भवतात.

### घ्यावयाची काळजी

- पिकासाठी निवडक तणनाशकाच्या डब्यावरील लेबल नीट वाचून घ्यावे. त्या लेबलवर संबंधित पिकाचे नाव असले पाहिजे. अन्यथा, तणनाशकाचा वापर त्या पिकासाठी करू नये.
- विद्यापीठ, संशोधन केंद्राच्या शिफारशींचा आधार घ्यावा. शिफारशीत तणनाशकेच मात्रेत व दिलेल्या वेळी अचूकपणे वापरावीत.
- तणनाशक फवारणीसाठी शक्यतो वेगळा (स्वतंत्र) नॅपसॅक पंप वापरावा. अगदीच वेगळा पंप वापरणे शक्य नसल्यास फवारणीनंतर पंप २ ते ३ वेळा साबण / डिटर्जंटने स्वच्छ धुऊन पुढील कामांसाठी वापरावा. तणनाशकाच्या फवारणीसाठी पॉवर स्प्रेचा वापर करू नये.
- उगवणपूर्व तणनाशक मारण्यापूर्वी जमीन ढेकळेरहित, भुसभुशीत आणि पुरेशी ओलसर असावी. फवारणीकरिता स्वच्छ पाणी वापरावे. अस्वच्छ, गढूळ, जड पाण्याचा वापर टाळावा. त्यामुळे तणनाशकाचा प्रभाव कमी होऊ शकतो.
- उगवणपूर्व तणनाशकाची फवारणी नेहमी वारा शांत असताना व स्वच्छ सूर्यप्रकाशात करावी. ढगाळ वातावरणात फवारणी करणे टाळावे. हवामान अंदाज पाहून फवारणीनंतर किमान ३ ते ४ तास पाऊस येणार नसल्याची खात्री करावी.
- उगवणपूर्व तणनाशकाची फवारणी पेरणीच्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी पिकाचे बी मातीने व्यवस्थित झाकल्यानंतरच करावी. तणांचे किंवा पिकांच्या बियांचे अंकुरण झाल्यावर फवारणी करू नये. कडक उन्हात उगवण पश्‍चात तणनाशकाची फवारणी टाळावी.
- उगवणपश्‍चात तणनाशकाचा वापर तणांच्या जोमदार वाढीच्या (२-४ पानांच्या अवस्थेत) अवस्थेत करावा. फवारणीवेळी तणनाशक तळाशी साचून राहू नये म्हणून द्रावण अधून मधून ढवळत राहावे. उगवणपूर्व तणनाशक फवारताना उलटे चालत यावे. म्हणजे फवारलेले शेत तुडवले जाणार नाही. किमान पुढील १२ ते १५ दिवस कोणतीही आंतरमशागत करू नये.
- ग्लायफोसेटसारखे बिन निवडक तणनाशक फवारल्यानंतर किमान २ आठवडे शेतात कोणतीही मशागत करू नये. ज्या पंपाद्वारे २,४-डी या तणनाशकाची फवारणी अन्य तृणधान्य पिकात केली असल्यास तो पंप कपाशीमध्ये तणनाशकाच्या फवारणीसाठी वापरू नये. तणनाशकाचा फवारा इतर (स्वतःच्या अथवा शेजारच्या शेतातील) पिकांवर उडणार नाही, याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे.
- तणनाशकाचे शिल्लक राहिलेले द्रावण कोणत्याही पिकाच्या जमिनीत, पाण्याचे डबके किंवा अन्य वाहत्या पाण्यात टाकू नये. तणनाशके फवारताना अन्नसेवन व धूम्रपान करू नये. तसेच पान, तंबाखू, सुपारी खाणे टाळावे. फवारणी करतेवेळी सर्व सुरक्षा साधने उदा. कपडे, हातमोजे व अन्य वापरावीत.
- तणांमध्ये तणनाशकांप्रति प्रतिकारशक्ती निर्माण होऊ नये, यासाठी एकाच तणनाशकांचा सातत्याने वापर टाळावा. तणनाशकाचा क्रमवार, आलटून पालटून व अन्य तण व्यवस्थापन पद्धतींच्या जोडीने वापर करावा. तणनाशक फवारलेल्या जमिनीत दरवर्षी चांगल्या कुजलेल्या शेणखत, कंपोस्ट खत अथवा गांडूळ खतांचा भरपूर वापर करावा.

### सुरक्षित तणनाशक वापरातील महत्त्वाच्या बाबी

- पिकानुसार तणनाशक निवड : साधारणतः विविध पिकांमध्ये निवडक तण नाशकाचा वापर केल्यास मुख्य पिकास कोणत्याही प्रकारची हानी अथवा इजा न होता तणांचे परिणामकारक नियंत्रण शक्य होते. कारण या निवडक तणनाशकामधील क्रियाशील घटकांसाठी ती पिके प्रतिकारक असतात. त्यामुळे विविध पिकांतील तणनाशकांसाठीचे लेबल क्लेम व शिफारशीनुसार उगवणपूर्व किंवा उगवणपश्‍चात वापर करावा.
- योग्य प्रमाण : तणनाशकांचा शिफारशीत प्रमाणातच वापर करावा. त्यासाठी कृषी विद्यापीठाच्या शिफारशी जाणून घ्याव्यात. तणनाशकासोबत मिळालेले लेबल किंवा बाटलीवरील माहिती वाचून त्यातील क्रियाशील घटकांचे प्रमाण व वापरासंबंधी जाणून घ्यावे. स्वतःच्या मनाने कमी किंवा अधिक प्रमाणात वापर करू नये.
- तणनाशक फवारणीसाठी पाण्याचे योग्य प्रमाण : तणनाशकाच्या प्रभावी वापरासाठी हेक्टरी पाण्याचे योग्य प्रमाण वापरणे खूप महत्त्वाचे असते. साधारणतः जमिनीवर फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या उगवणपूर्व तणनाशकासाठी हेक्टरी ६०० ते ७०० लिटर पाणी वापरावे. तर उगवणपश्चात तणनाशकाच्या फवारणीसाठी हेक्टरी ५०० लिटर पाणी वापरावे.
- तणनाशके वापरण्याच्या योग्य पद्धती : तणनाशकाच्या सुरक्षित वापरामध्ये योग्य पद्धतींचा वापर करणे गरजेचे असते. संपूर्ण क्षेत्रावर सम प्रमाणात फवारणी करण्याची पद्धती बहुतांश वेळा वापरली जाते. पट्टा पद्धतीमध्ये तणनाशकाची फवारणी केवळ पेरलेल्या किंवा लागवड केलेल्या पिकांच्या ओळीमध्ये करतात. पिकांच्या दोन ओळींतील तणांच्या नियंत्रणासाठी संचालित उपचार पद्धतीचा उपयोग केला जातो. सुरक्षित फवारणी पद्धत आर्थिकदृष्ट्या अधिक मूल्य असणाऱ्या पिकामध्ये तणनाशक फवारणी सुरक्षित फवारणी पद्धतीचा अवलंब केला जातो. ही पिके धातू किंवा प्लॅस्टिकच्या आवरणाने आच्छादित करून नंतर तणनाशकाची फवारणी केली जाते. संरक्षित कवच लावूनसुद्धा तणनाशक मुख्य पिकावर पडणार नाही, याची काळजी घेऊन पिकांच्या दोन ओळींमध्ये जमिनीवर व तणांवर फवारले जाते.
- योग्य नोझलचा वापर : तणनाशकाच्या सुरक्षित व प्रभावी वापरासाठी फ्लड जेट नोझल किंवा फ्लॅट फॅन नोझलचा वापर करावा. असे नोझल कमी दाबावर सम प्रमाणात फवारा उडवतात. संरक्षित कवच किंवा हूड लावावे.

### ‘2,4 डी’ या तणनाशकाचा वापर करताना घ्यावयाची काळजी

पुढील हंगामात कपाशीची लागवड करणार असाल तर आधीच्या हंगामातही त्या शेतात २,४ डी तणनाशकाचा वापर करू नये. कारण या तणनाशकाची सूक्ष्ममात्राही पिकासाठी हानिकारक ठरते. २,४ डी तणनाशकाची फवारणी वारा शांत असताना व आसपासच्या पिकांवर त्यांचे अवशेष जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी. २,४ डी फवारणी केलेल्या शेतामधून पाणी वाहून येणार नाही, हे पाहावे, या तणनाशक फवारणीसाठी वापरलेला पंप अन्य फवारणीसाठी वापरू नये. कपाशी पिकाच्या आसपास २,४ डी हे तणनाशक अजिबात फवारू नये. बियाणे विक्रेत्यांनी तणनाशक आणि कापूस बियाणे वेगळ्या वेगळ्या ठिकाणी ठेवावे.



# राष्ट्रीय महामार्गालगत नवीन ढाबे, हॉटेल्स आणि व्यावसायिक बांधकामांना बंदी

**मुंबई (प्रतिनिधी)** – राष्ट्रीय महामार्गांवर होणारे भीषण अपघात आणि महामार्ग क्षेत्रात वाढणाऱ्या अतिक्रमणांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी महाराष्ट्रात सुरू झाली आहे. त्यानुसार, राज्यातील सर्व राष्ट्रीय महामार्गांच्या 'राईट ऑफ वे' म्हणजेच महामार्ग क्षेत्राच्या हद्दीत नवीन ढाबे, हॉटेल्स, उपहारगृहे किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या व्यावसायिक बांधकामांना आणि त्यांच्या संचालनाला तातडीने बंदी घालण्यात आली आहे. त्याशिवाय महामार्गांच्या हद्दीतील सर्व जुनी आणि नवीन अनधिकृत बांधकामे येत्या ६० दिवसांच्या आत पाडण्याचे अथवा हटवण्याचे थेट निर्देश राज्य शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने सोमवारी परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी आणि नगरपंचायतींचे प्रशासक यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची तात्काळ आणि तांतोतांत अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महामार्गाच्या हद्दीत उभी राहिलेली सर्व अनधिकृत बांधकामे हटवण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना ६० दिवसांची मुदत देण्यात आली आहे.


## टी.सी. हरवली

मी महेजबीन मोहम्मद वाजिद समीराबाग ते वजिराबाद ला ऑटो रिक्षा ने प्रवास करताना माझी बारावी वर्गाची मूळ टीसी (टीसी क्रमांक ३८३६) व मार्कशीट हरवली आहे, जर कोणाला सापडले असल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा..

पत्ता : महेजबीन मोहम्मद वाजिद
वकील कॉलनी, समीराबाग झेबा फंक्शन हॉल च्या बाजुस, वाघी रोड नांदेड मोबाईल नंबर: ९१११२३९१२३४ /९०४९१८४२३२

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षकपद भरती जाहिरात २०२६
### शैक्षणिक वर्ष – २०२६–२७
### कै.व्यंकटराव देशमुख शिळवणीकर शैक्षणिक व सामाजिक संस्था, शिळवणी ता.देगलूर जि. नांदेड

**संस्था कोड–271507SC019 संचलित**

कै. व्यंकटराव देशमुख माध्यमिक विद्यालय शिळवणी ता. देगलूर जि. नांदेड युडायस कोड – 27150707805 शंभर टक्के अनुदानित शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यवसायिक आर्हता धारक व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवाराकडून दि. ११/०८/२०२६ पर्यंत प्राधान्यक्रम घेण्यात येत आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

वरील जागा इ.मा.व. राखीव असून नमुद आरक्षणानुसार पात्र उमेदवारांनी https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने संस्था कोड 271507SC019 या पसंतीक्रम देवून नोंद करावे. वरील शिक्षक भरती शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या निर्णयाच्या आधिन राहिल.

| क्र. | पद | विषय | शैक्षणिक पात्रता | व्यावसायिक पात्रता | TET/ CTET | पदसंख्या | संवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सहशिक्षक ९ ते १० वी | English | पदवीधर | बी.एड. | - | 1 | इ. मागासवर्ग |

सचिव
कै. व्यंकटराव देशमुख शिळवणीकर शैक्षणिक व सामाजिक संस्था शिळवणी ता. देगलूर जि. नांदेड

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षकपद भरती जाहिरात २०२६
### शैक्षणिक वर्ष – २०२६–२७
### कन्यका परमेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ, हडको संचलित

**संस्था कोड–271501SC021 संचलित**

राष्ट्रमाता कस्तुरबा गांधी हायस्कुल, हडको, नांदेड शंभर टक्के अनुदानित शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यवसायिक आर्हता धारक व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | शैक्षणिक पात्रता | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मराठी | पदविधर ९ ते १० वी | 18000/- | १००% अनुदानित | इंग्रजी | – | बी.ए./एम.ए., बी.एड्. | १ |
| २. | मराठी | पदविधर ९ ते १० वी | 18000/- | १००% अनुदानित | विज्ञान | मराठी | बी.एस्सी./एम. एस्सी./बी.एड्. | १ |

वि.जा.अ., खुला वरील पदासाठी आरक्षणानुसार पात्र उमेदवारांनी https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने संस्था कोड 271501SC021 या पसंतीक्रम देवून नोंद करावे. वरील शिक्षक भरती शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या निर्णयाच्या आधिन राहिल.

**नोट** : वरील एक पद महिलांसाठी प्राधान्य.

मुख्याध्यापक
राष्ट्रमाता कस्तुरबा गांधी हायस्कुल, हडको, नांदेड

अध्यक्ष/सचिव
कन्यका परमेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ हडको नांदेड

## Change In Name

My Old Name is **SYEDA TAMKANAT AMENA** Which Now I Am Changing As New Name **SYEDA TAMKANAT AMENA MOHAMMED ASJAD KHAN.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- 8-1-145 MANDHAI, NEAR MANSOOR KHAN HAVELI, CHOUPALA ROAD, NANDED - 431604**

## Change In Name

My Old Name is **SAEEDA KHANUM** Which Now I Am Changing As New Name **SAEEDA KHANUM SYED YAKUB ALI** . Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- KOHINOOR COLONY, KAUTHA ROAD BASMATH - 431512**

## Change In Name

My Old Name is **ANISODDIN SHAIK NASIRODDIN** Which Now I Am Changing As New Name **SHAIKH ANISODDIN NASIRODDIN.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- Mitr Nagar, Nanded**
**Mo.No. 9028986181**

## टी.सी. हरवली

साजेदा बेगम रशिद खान, वय ६२ वर्षे, रा. लेबर कॉलोनी, नांदेड, यांचा इयत्ता ९ वीचा मूळ शाळा सोडल्याचा दाखला (T.C.), शैक्षणिक वर्ष १९७७, हा आय.टी.आय. ते श्रीनगर, नांदेड दरम्यान ऑटोने प्रवास करत असताना हरविला आहे. सदर मुळ T.C. कोणास आढळल्यास / सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

साजेदा बेगम रशिद खान रा. लेबर कॉलोनी, नांदेड. मो. ८०८७१५९१०३

## टी.सी. हरवली

माझी रितेश वैजनाथ शिंदे या नावाची बारावी पासची टी.सी. नांदेड ते नायगाव प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क पत्ता**
**रितेश वैजनाथ शिंदे**
**रा. तिरूपती अपार्टमेंट, मगरपुरा नांदेड मो.नं. ९९२३३४८५७१**

## Change In Name

My Old Name is **PIRMABEE MOHAMAD** Which Now I Am Changing As New Name **PIRMABEE ABDULKHADAR SHAIKH.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

My Old Name is **MOHSINA BEGUM MOHAMAD** Which Now I Am Changing As New Name **MOHSINABEGUM ISA SHAIKH.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

My Old Name is **SHABBIR AHMED** Which Now I Am Changing As New Name **SHABBIR AHMED BASHARAT ALI.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- wajegaon, Near darul uloom Jamiya Mariyam LillBanat Wajegaon Nanded, Lalwadi, PO: Wajegaon, DIST: Nanded, Maharashtra - 431602**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतास या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, भीमाशंकर सहकारी गृह निर्माण संस्था म. गोपाळचावडी ता.जि. नांदेड या संस्थेचा गोपाळचावडी येथील गट नंबर ३५ पैकी एक प्लॉट क्र. ५२ गंगाधर माधवराव धानोरकर यांच्या मालकीचा असून सदरील प्लॉटची साईज लांबी १५.०० मिटर व रुंदी १२.०० मिटर आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १८० चौ.मी. आहे. ज्याची चर्तुः सिमा पुढील प्रमाणे आहे.

पूर्वेस – श्री षडाक्षर शिवाचार्य स्वामीजी यांची जमीन
पश्चिमेस – प्लॉट नं. ५३ आहे.
दक्षिणेस – संस्था अंतर्गत ९ मीटरचा रोड.
उत्तरेस – प्लॉट क्र. ५१

वरील वर्णनाचा प्लॉट श्री गंगाधर माधवराव धानोरकर यांनी त्यांच्या आर्थिक अडचणीमुळे प्लॉट क्र. ५२ मधील अर्धा प्लॉट श्री रमेश माधवराव कुऱ्हाडे रा. धानोरा ता. नायगाव जि. नांदेड यांना कायमस्वरुपी विक्री केला आहे. खरेदीदाराच्या नावाने प्लॉट व सभासद शेअर्स हस्तांतरण करण्यासाठी संस्थेत प्रस्ताव सादर केला आहे.

तरी वरील वर्णनाचा प्लॉट हस्तांतरण करण्याबाबत वारस, नातलग, किंवा इतर कोणाचाही उजर, दावा, आक्षेप, हक्क किंवा सहकारी, सरकारी, निमसरकारी कर्ज बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह या संस्थेच्या कार्यालयात दाखल करावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. व सदरील प्लॉट क्र. ५२ दोघांच्या नावावर हस्तांतर करण्यात येईल.

जाहीर प्रगटन देणार
श्री एकनाथराव मामडे, सचिव — श्री ईश्वरराव भोसीकर (मा.आमदार), चेअरमन
भीमाशंकर सहकारी गृहनिर्माण संस्था म. गोपाळचावडी ता.जि. नांदेड औफीस संपर्क : ९०९६४६६२६४

## Change In Name

My Old Name is **ABDUL KHADAR MOHAMAD** Which Now I Am Changing As New Name **ABDULKHADAR HASANSAB SHAIKH.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## शुद्धीपत्रक

दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी दै. गोदातीर समाचार या वृत्तपत्रात पान ५ वर नोबल हायस्कूल लेबर कॉलनी नांदेड यांची पाहिजेत ही जाहिरात प्रसिद्ध झाली असून त्यामध्ये दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या मुलाखतीस उर्दू माध्यमाचे उमेदवार उपस्थित रहावे व वर्ग ६ ते ८ असे दुरूस्त वाचावे.

**मुख्याध्यापक**
**नोबल हायस्कूल (उर्दू) माध्यम**
**लेबर कॉलनी नांदेड**

## जाहीर प्रगटन

मौजे कुंभारवाडी (ख.) ता. कळमनुरी जि. हिंगोली येथील शेत गट नं. ११४ मधील माझ्या मालकीची व ताब्यातील जमीन क्षेत्रफळ २६ आर. पूर्ण जमीन दिपक गंगाधरराव जाधव रा. कुर्तडी ता. कळमनुरी जि. हिंगोली यांचेकडून सुरजकुमार सुभाषराव देवसरकर रा. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

शेत जमिनीची चतुःसिमा– पूर्वेला – नांदेड–हिंगोली राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१, पश्चिमेला – दगडु नानाराव जाधव यांचे शेत, दक्षिणेला – मधुकर विठ्ठलराव मोरे यांचे शेत व उत्तरेला – छायाबाई उत्तमराव बहात्तरे यांचे शेत.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर शेतीचे खरेदीखत सुरजकुमार सुभाषराव देवसरकर यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**सुरजकुमार सुभाषराव देवसरकर**
**रा. नांदेड मो.नं. ९९२१८३१२२६**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED ESSA** Which Now I Am Changing As New Name **ISA ABDULKHADAR SHAIKH.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व सबंधितास या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आम्ही पाटील बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. नागेश तुकाराम वाघमारे व इतर दोघे जण मौजे तरोडा (खु.) ता.जि.नांदेड गट क्र. 193 पैकी प्लॉट नंबर 59, 60, 61 व 62 असे चार प्लॉट खरेदी करत आहोत. त्यापैकी दोन प्लॉट ज्यांचा प्लॉट नंबर 59 व 60 हे डॉ.श्री. संदिप पि. मदन चक्करवार, वय 40 वर्षे, रा. नरहर नगर तरोडा (खु.), नांदेड ता.जि.नांदेड यांच्या मालकीचे आहेत व तसेच दोन प्लॉट ज्यांचा प्लॉट नंबर 61 व 62 हे श्री. आनंद पि. मारूतीराव चाटे, वय 47 वर्षे, रा. राजेश नगर, तरोडा (खु.) नांदेड ता.जि.नांदेड यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील प्लॉट खरेदी करण्याचा करार केला असुन ज्याची चतुःसिमा पुर्वेस- 25 फुटाचा रोड आहे, पश्चिमेस- प्लॉट नंबर 55, 56, 57 व 58 आहेत, दक्षिणेस- प्लॉट क्र. 63 आहे व उत्तरेस- गट क्रमांक 193 चा भाग आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ 4950 चौरस फुट आहे.

याप्रमाणे चतुःसिमेच्या आतील प्लॉट खरेदी करण्याचा करार केला आहे. बयाना पोटी इसारा रक्कम दिली आहे. उर्वरित रक्कम देऊन व प्लॉटचा ताबा घेऊन खरेदीखत करून घेण्याचे ठरले आहे. सदर व्यवहारास कोणाचा काही आक्षेप, उजर, हितसंबंध, वारसा हितसंबंध, जमीन कर्जबोजा, गहाणखत केले असल्यास संबंधितांनी सदर व्यवहारास आपला आक्षेप लेखी स्वरूपात पुराव्यासहीत खालील पत्त्यावर आजपासुन 8 दिवसात दि. 18/08/2026 रोजीपर्यंत लेखी आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप / तक्रार आमच्याशी बंधनकारक राहणार नाही. त्यानंतर आम्ही रितसर खरेदीखत करून पुर्ण व्यवहार करत आहोत. करीता जाहीर प्रगटन देत आहे.

जाहीर प्रगटन देणार- पाटील बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री.नागेश तुकाराम वाघमारे व इतर दोघे जण रा. तुकामाई निवास, प्लॉट नंबर 12, भारत नगर, ए.के. संभाजी मंगल कार्यालय रोड, पावडेवाडी नाका नांदेड, ता.जि.नांदेड-431602, मो.नं. 9420210826, 7350619622

स्वा/–
ॲड.महेंद्र एस. थोरात
नांदेड मो.नं. ८८५५०१८६९८

## जाहीर प्रगटन

मौजे म्हाळजा ता.जि. नांदेड हद्दीतील सर्व्हे नं. ४ मधील स्वामी रामानंद तीर्थ चतुर्थ श्रेणी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. म्हाळजा ता.जि. नांदेड येथील प्लॉट क्र. २३७ व २३८ वर टीनशेड शटर असलेले बांधकाम, २४६ साईज ओपन स्पेस जागा सदर वर्णनाचे प्लॉट १) मोहम्मद हसीब उर रहेमान पि. मो. लईखुर रहेमान रा. हैदबाद नं. १, नांदेड २) वाजेद उन्नीसा बेगम भ्र. एम.एल. रहिमान रा. इस्लाहुल्ल जामल हायस्कूल, होळी नांदेड ३) मोहम्मद महेबुब रहेमान पि. मोहम्मद लईखुर रहेमान रा. एलआयसी कार्यालय, नांदेड यांचेकडून १) मोहम्मद साजीद इरफान मोहम्मद युसुफ खान रा. दुधगल्ली, खुबा मस्जिद जवळ, उमर कॉलनी, नांदेड २) सय्यद रफीक पि. सय्यद इसाक रा. इकबाल नगर, इतवारा नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

१) प्लॉट नं. २३७ ची चतुःसिमा साईज २५ बाय ३०
पूर्वेस – प्लॉट नं. २३८, पश्चिमेस – प्लॉट नं. २३६, दक्षिणेस – प्लॉट नं. ४० फुट रूंद रोड, उत्तरेस – प्लॉट नं. २४७.
२) प्लॉट नं. २३८ ची चतुःसिमा साईज २५ बाय ३०
पूर्वेस – प्लॉट नं. २३९, पश्चिमेस – प्लॉट नं. २३७, दक्षिणेस – प्लॉट नं. ४० फुट रूंद रोड, उत्तरेस – प्लॉट नं. २४६.
३) प्लॉट नं. २४६ ची चतुःसिमा साईज २५ बाय ३०
पूर्वेस – प्लॉट नं. २४५, पश्चिमेस – प्लॉट नं. २४७, दक्षिणेस – प्लॉट नं. प्लॉट क्र. २३८, उत्तरेस – रोड आहे.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत १) मोहम्मद साजीद इरफान मोहम्मद युसुफ खान २) सय्यद रफीक पि. सय्यद इसाक यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**मोहम्मद साजीद इरफान मोहम्मद युसुफ खान**
**रा. दुधगल्ली, खुबा मस्जिद जवळ, उमर कॉलनी, नांदेड व इतर मो.नं.९८६०७८५२२५**

## पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक पदभरती जाहिरात–२०२६
### श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, किनवट ता.किनवट जि. नांदेड

**नोंदणी क्रमांक महा १६३/९५ नांदेड एफ–४४०७ नांदेड संस्था कोड – 271501SC114**

संस्था द्वारा संचलित माध्यमिक विद्यालय तुळशी (परिसर) ता. माहुर जि. नांदेड या विद्यालयात खालील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | आवश्यक शैक्षणिक / पात्रता व्यावसायिक पात्रता | टीईटी / सीईटी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | मराठी | पदवी (9-10) | S-14 : 38600 - 122800 | अंशतः अनुदानित 40% | मराठी | बी.ए. बी.एड्. | – | 01 |
| 02 | मराठी | पदवी (9-10) | S-14 : 38600 - 122800 | अंशतः अनुदानित 40% | इंग्रजी | बी.ए. बी.एड्. | – | 01 |

वरील रिक्त पदांपैकी ०१ पद विमुक्त जातीसाठी व ०१ पद इतर मागास वर्गासाठी राखीव असून नमूद आरक्षणानुसार पात्र उमेदवारांनी **https:tait2025.mahateacherrecruitment.org.in** या संकेत स्थळावर ऑनलाईन संस्था कोड – **27150SC114** पसंतीक्रमाने नोंद करावा. शिक्षक पदभरती शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या नियमांच्या आधीन राहील.

स्थळ :– माध्यमिक विद्यालय, तुळशी (परिसर) ता. माहुर जि. नांदेड

स्वा/–
सचिव
श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, किनवट

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# वजिराबादच्या भरस्त्यावरील केक हबमध्ये लूट

## सीसीटीव्हीच्या आधारे २ आरोपी ताब्यात, १ फरार



**नांदेड (प्रतिनिधी)**– वजिराबाद येथील 'केक हब' दुकानात केक खरेदीच्या बहाण्याने आलेल्या तीन अनोळखी युवकांनी दुकानदाराला धमकावून ४ हजार ५०० रुपये रोख लुटल्याची घटना दि. ९ ऑगस्ट रोजी रात्री घडली होती. या प्रकरणी वजिराबाद गुन्हे शोध पथकाने तातडीने तपास करून दोन आरोपींना अटक केली आहे.

फिर्यादी नेहमीप्रमाणे रात्री दुकानात काम करत असताना २० ते २५ वयोगटातील तीन युवक स्प्लेंडर मोटारसायकलवरून दुकानात आले. त्यांनी केक दाखवण्यास सांगितले आणि नंतर फिर्यादीकडे पैशांची मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी शिवीगाळ करून धाक दाखवला आणि फिर्यादीच्या खिशातील ४ हजार ५०० रुपये रोख जबरदस्तीने काढून घेतले. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३९७/२०२६, भा. न्या. सं. कलम ३०९(४), ३५१(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या नेतृत्वात पोउपनि सुनील बुलंगे व त्यांच्या पथकाने तपास सुरू केला. पथकाने घटनास्थळावरील सीटीव्ही फुटेज तपासले. त्यात आरोपी (एमएच-२६ सीटी-२९४७) क्रमांकाची मोटारसायकल वापरत असल्याचे दिसले. तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे.

पोलिसांनी तारू शेषराव खिल्लारे, (वय २६, रा. गोवर्धनघाट टेकडी, नांदेड) आणि अनिकेत कालिदास खिल्लारे (वय २०, रा. बौद्ध विहार जवळ, गोवर्धनघाट टेकडी, नांदेड) या दोघांना अटक केली असून, योगेश ज्ञानेश्वर वाघमारे हा फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. लुटलेली रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. तपास पोउपनि सुनील बुलंगे करीत आहेत. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर वैजनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजित कुंभार, सपोनि प्रशांत लोंढे, पोउपनि सुनील बुलंगे आणि पथकातील शिवशांब मठपती, विलास कदम, ज्वालासिंघ बावरी, संतोष पोकळे, संतोष पावडे, भाऊसाहेब राठोड, इम्रान पठाण यांनी पार पाडली.

नागरिकांनी धमकी किंवा लुटीच्या घटनेला घाबरून न जाता तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. तसेच दुकानदारांनी सीटीव्ही कॅमेरे कार्यरत ठेवावेत, जेणेकरून आरोपींचा शोध घेण्यास मदत होईल.

## ४ ऑक्टोबरची नांदेड-फिरोजपूर कॅन्टोनमेंट एक्सप्रेस दिल्ली सफदरजंगला थांबणार नाही

**नांदेड (प्रतिनिधी)**– उत्तर रेल्वेकडून करण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी कामामुळे गाडी क्रमांक १४६२१ नांदेड-फिरोजपूर कॅन्टोनमेंट एक्सप्रेसच्या मार्गात तात्पुरता बदल करण्यात आला आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेने दिली आहे.

दिल्ली विभागातील हजरत निजामुद्दीन रिंग रेल्वे विभाग आणि दिल्ली कॅन्टोनमेंट पटेल नगर विभागातील ब्रार स्क्वेअर व पटेल नगर स्थानकांदरम्यान या कामासाठी आवश्यक असलेला वीज व वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार असल्याने हा तात्पुरता मार्गबदल करण्यात आला आहे.

ओखला हजरत निजामुद्दीन नवी दिल्ली दिल्ली किशनगंज शकूरबस्ती या मार्गबदलामुळे दिल्ली सफदरजंग स्थानकावरील थांबा रद्द राहील. प्रवाशांनी या तात्पुरत्या मार्गबदलाची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी यूपीएससीला प्राधान्य देऊन देशसेवेसाठी प्रशासनात यावे -आर. सी. सिन्हा




**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी यूपीएससी परीक्षा देऊन देशसेवेसाठी प्रशासनात यावे, असे आवाहन माजी आयपीएस अधिकारी आणि २५ वर्षांपासून यूपीएससी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे नामवंत शिक्षक आर. सी. सिन्हा यांनी केले.

आंबेडकरवादी मिशन आणि 'नेक्स्ट आयएएस, नवी दिल्ली' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आयएएस अभ्यास रणनीती' या मार्गदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

सिन्हा म्हणाले, यूपीएससी परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा सूक्ष्म अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. २०१७ पासूनच्या मुख्य परीक्षेच्या प्रश्नपत्रिका बारकाईने अभ्यासा, प्रथम मुख्य परीक्षेची तयारी करा, त्यानंतर पूर्वपरीक्षेकडे वळा, स्वतःच्या नोट्स तयार करा आणि वर्तमानपत्रांचे नियमित वाचन करा, राजस्थानचे आयएएस अधिकारी मोहित गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, तयारी करताना संकल्पना स्पष्ट असाव्यात. प्रत्येक विषयासाठी कमीत कमी, पण दर्जेदार १-२ पुस्तके वापरा, अभ्यासाचा आनंद घ्या.

या कार्यक्रमामागील भूमिका आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी मांडली. देशपातळीवरील सर्व मार्गदर्शन संसाधने आंबेडकरवादी मिशनच्या माध्यमातून उपलब्ध आहेत, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला एसीबीचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, आयएएस मोहित गुप्ता, एकनाथ मोरे, डॉ. गोविंद नांदेडे, डॉ. यशवंत चव्हाण, प्रा. व्ही. डी. कोनाळे, डॉ. हनुमंत भोपाळे, अंजूसिंग, डॉ. भास्कर दवणे, डॉ. सुरेश घुले, रोहिदास मादळे, दिगंबर मोरे, सुशील चिकटे आदी मान्यवर उपस्थित होते. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील शेकडो विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# पेट्रोलपंपावरील खून प्रकरणी 'स्थागुशा'च्या पथकाने ५ आरोपी केले गजाआड



**नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको परिसरातील शासकीय दूध डेअरीजवळ एका पेट्रोलपंपावर खंजरने भोसकून एकाचा निर्घृण खून करणाऱ्या पाच जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वेगवेगळ्या भागातून अटक केली आहे. हा खून कट रचून व फायनान्सच्या देवाण-घेवाणीतून झाल्याचे तपासात पुढे आले आहे. सर्व आरोपींना नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यात गेल्या २४ तासांत घडलेल्या तीन गंभीर गुन्ह्यांवर नांदेड पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले आहे. नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील धनेगाव येथे दि. ८ ऑगस्ट रोजी झालेल्या इंदरजितसिंघ बावरी खून प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत छडा लावला आहे.

फिर्यादी आणि मयत इंदरजितसिंघ बलजितसिंघ बावरी (वय २५, रा. संत गाडगेबाबा सोसायटी, जुना कौठा नांदेड) हे पेट्रोल भरण्यासाठी धनेगाव येथील पेट्रोल पंपावर गेले होते. यावेळी आरोपी नितीन बिगानिया, दिलीप डाकोरे, कृष्णा परदेशी व त्यांचे साथीदार मोटारसायकलवरून तेथे आले. पूर्वीच्या वादातून कट रचून त्यांनी इंदरजितसिंघ याच्यावर खंजरने वार करून खून केला होता. तसेच फिर्यादीला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली होती. या प्रकरणी गु. र. नं. ९५१/२०२६, भा. न्या. सं. कलम १०३(१), १८९(२), १९०, १९१(३), ६१(२)(अ) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ नुसार गुन्हा दाखल आहे. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेची पथके तत्काळ रवाना झाली. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी ५ आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत आरोपी दिलीप पुंडलिक डाकोरे (वय ३३, रा. शंभरगाव ता. लोहा), कृष्णा दिगंबर बारोळे (वय २९, रा. किवळा ता. लोहा), रणजीत उर्फ रंज्या चांद्र सूर्यवंशी (वय २३, रा. गोवर्धनघाट टेकडी, नांदेड), ज्योती जगदिश बिगानिया (वय ४०, रा. नरोबा मंदिरामागे, रविनगर, नांदेड) आणि एक अल्पवयीन आरोपींचा समावेश आहे.

फिर्यादी आणि मयत हे फायनान्सचे काम करत होते. ८ दिवसांपूर्वी त्यांनी हप्ते थकीत असलेली आरोपीची बजाज पल्सर २२० दुचाकी एजन्सीच्या सांगण्यावरून जप्त करून यार्डमध्ये जमा केली होती. त्याच रागातून पूर्वनियोजित कट करून हा खून करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

## आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज रक्तदान शिबिराचे आयोजन



**लोहा (प्रतिनिधी)** – रक्तदान हे श्रेष्ठदान, वाचवी रुग्णांचे प्राण यानुसार लोहा - कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर व युवानेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा शहरात दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी स. ११ वा. पोलीस स्टेशन समोर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन संयोजकांनी केले असल्याचे कळविले आहे.

# नांदेडमध्ये १४ ते १६ ऑगस्टला 'सप्तरंग सांस्कृतिक महोत्सव'

### अनेक कलाकारांसह आरोग्य शिबीर आणि पुरस्कार सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय संस्कृती, लोककला आणि सामाजिक बांधिलकीचा अनोखा संगम असणारा सप्तरंग सांस्कृतिक महोत्सव - २०२६ दि. १४, १५ व १६ ऑगस्ट रोजी कुसुम सभागृह, नांदेड येथे होणार आहे. सप्तरंग सेवाभावी संस्था व जिल्हा प्रशासन नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या तीन दिवसीय महोत्सवात देशातील ८ राज्यांतील सुमारे ५०० कलाकार सहभागी होऊन ४७० हून अधिक कला प्रकार सादर करणार आहेत. शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य, लावणी, गायन, वाद्यवादन, समूह नृत्य आदींची नांदेडकरांना सांस्कृतिक मेजवानी मिळणार आहे. वाढत्या गर्दीमुळे कार्यक्रमांसाठी 'स्वरसम्राज्ञी आशा भोसले' आणि 'के. तीजनबाई' असे दोन स्वतंत्र रंगमंच उभारण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय वक्तृत्व, निबंध व चित्रकला स्पर्धा होणार असून, जिल्हा परिषदेचे सहकार्य लाभले आहे. विषय देशभक्ती, संस्कृती, पर्यावरण व संविधानावर आधारित आहेत. महोत्सवात मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. नेत्रतपासणी, रक्तदाब, साखर, ईसीजी, दंत तपासणी, फिजिओथेरपी व एंडोस्कोपी मार्गदर्शन येथे मिळेल. १५ व १६ ऑगस्टला तृतीयपंथी सक्षमीकरण चर्चासत्र व रोजगार मेळावाही होणार आहे.

समारोपात डॉ. हंसराज वैद्य यांना 'जीवन गौरव', डॉ. नितीन जोशी यांना 'आरोग्य भूषण', ॲड. दिलीपसिंह ठाकूर यांना 'सामाजिक आयकॉन' यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार दिले जातील. महोत्सवाचे नेतृत्व डॉ. सान्वी जेठवाणी करीत आहेत. या सोहळ्याला राज्यातील मंत्री, लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# नागबर्डी देवस्थान यात्रेनिमित्त पशु प्रदर्शन व कबड्डी सामन्यांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**–नागपंचमी सणानिमित्त नागोबा देवस्थान नागबर्डी गुंडा ता. कंधार येथे सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी लालकंधारी जनावरांचे पशुप्रदर्शन व खुले कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य विधीमंडळ उपविधान समिती प्रमुख तथा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची उपस्थिती लाभणार आहे. पशु प्रदर्शन व कबड्डी सामन्यांचा शुभारंभ आ. चिखलीकर यांच्या हस्ते होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही कंधार तालुक्यातील गुंडा येथील नागबर्डी देवस्थानच्या वतीने पंचमी सणानिमित्त पशु प्रदर्शन व खुले कबड्डी सामन्यांचे आयोजन १७ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कंधार-लोहा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आ. आनंदराव बोंढारकर माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, सुभाषराव साबणे, जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. प्रणितताताई देवरे, कंधारचे उपविभागीय अधिकारी व्ही. बी. नरवटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

## तामसा येथे १३ ऑगस्टला तिरंगा रॅली

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाला सलाम आणि तिरंग्याच्या सन्मानासाठी हदगाव तालुक्यातील तामसा येथे यंदा स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

देशभक्तीची गर्जना करणारी ही रॅली गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता जुने बस स्टँड, तामसा येथून मुख्य रस्त्यावरून निघून छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ सांगता होणार आहे, अशी माहिती भाजपाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी दिली.

शेकडो स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले. भगवा आणि तिरंगा ही केवळ वस्त्रे नाहीत, तर ती आपल्या संस्कृती, स्वाभिमान आणि बलिदानाची ओळख आहेत. हर घर तिरंगा ही मोहीम म्हणजे त्या वीरांना खरी श्रद्धांजली आहे. देशहितासाठी प्रत्येक बांधवाने एकजूट दाखवून राष्ट्रधर्म पाळणे ही काळाची गरज आहे. सर्व धर्मप्रेमी, राष्ट्रप्रेमी बांधवांनी आपल्या कुटुंबासह सहभागी व्हावे, असे आवाहन कण्यात आले आहे.

रॅली यशस्वी करण्यासाठी विविध संघटनेचे पदाधिकारी, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला भगिनी परिश्रम घेत आहेत.

# सुजलेगावच्या शेतशिवारातील जुगार अड्ड्यावर कुंटूर पोलिसांचा छापा

### पाच जणांना अटक; ३ लाख १३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – तालुक्यातील सुजलेगाव शेतशिवारात सुरू असलेल्या 'तिर्रट' जुगार अड्ड्यावर कुंटूर पोलिसांनी छापा टाकून पाच जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रकमेसह दोन मोटारसायकली, एक बुलेट, चार मोबाईल संच आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ३ लाख १३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी कुंटूर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती सपोनि विशाल भोसले यांनी दिली आहे.

नांदेड जिल्ह्यातील जुगार, मटका आणि अन्य अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम सुरू आहे. त्याच मोहिमेअंतर्गत ८ ऑगस्ट रोजी कुंटूर पोलिसांना सुजलेगाव शेतशिवारात काहीजण पैशांची बाजी लावत 'तिर्रट' जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी जुगार खेळणाऱ्या पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २१ हजार ७०० रुपये रोख, दोन मोटारसायकली व एक बुलेट अशी सुमारे २ लाख २० हजार रुपयांची वाहने, विविध कंपन्यांचे चार मोबाईल संच किंमत ७२ हजार रुपये, तसेच जुगाराचे साहित्य असा एकूण ३ लाख १३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत रवीराज उत्तम जुकर्रे (वय २७, रा. सुगाव, ता. देगलूर), सुनील माधवराव उच्चे (वय २५, रा. करेमलक्कापूर, ता. देगलूर), साईराज रामकिशन कदम (वय २९), अभिषेक योगेश्वर हरगे (वय २७) आणि लक्ष्मण किशनराव तरकंटे (वय ३३, तिघेही रा. सुजलेगाव, ता. नायगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २०३/२०२६, कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# यशवंतराव चव्हाण शिक्षक पतसंस्थेच्या निवडणुकीत 'गुरुकृपा पॅनल'चा १५ पैकी १५ जागांवर विजय

**नांदेड (प्रतिनिधी)**– यशवंतराव चव्हाण शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व इतर संघटना पुरस्कृत 'गुरुकृपा शिक्षक सहकारी पॅनल' ने विजय मिळवला आहे. या निवडणुकीत पॅनलचे १५ पैकी १५ उमेदवार प्रचंड मतांनी निवडून आले आहेत.

या विजयानंतर नवनिर्वाचित सर्व संचालक बंधू-भगिनींचा शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याला पॅनल प्रमुख तथा शिक्षक परिषदेचे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांमध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शिवा नरंगले, प्राचार्य खुशाल पाटील पांडागळे, उर्दू शिक्षक संघटनेचे अध्यक्ष एम. ए. गफ्फार, शिवा कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष विठ्ठलराव ताकबिडे, शिक्षक परिषदेचे राज्य संघटनमंत्री सुरेश दंडवते, निळकंठ चोंडे, शिक्षक संघाचे नेते बाबुराव फसमले, शिक्षक नेते अशोक बावणे पाटील, संजय कोठाळे, दत्तप्रसाद पांडागळे, बालाजी राजेंद्र पाटील बामणे, दिगंबर पाटील मांजरकर, पाराजी पाले, शिक्षक समितीचे नेते नागभूषण दुर्गम, पुरोगामी शिक्षक संघटनेचे नेते जी. एस. मंगनाळे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष व्यंकट गंदपवाड, माध्यमिक शिक्षक संघटनेचे वैजनाथ हंगरगे, चंद्रकांत कुणके, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बाबुराव माडगे, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष तसलीम शेख, शंकर हासगुळे, पती-पत्नी एकत्रीकरण संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत भिंगोले, पुरोगामी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक मोरे, शिक्षक परिषदेचे जिल्हा कार्यवाह प्रल्हाद राठोड यांच्यासह जिल्ह्यातील सहकारी संघटनांचे सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# किनवट येथे किसान सभेचे घेराव आंदोलन



**किनवट (प्रतिनिधी)** – शेतकरी, शेतमजूर, कामगार योजना कर्मचारी व सर्वसामान्य जनतेच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी दुपारी उपविभागीय अधिकारी कार्यालय, किनवट येथे घेराव आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे नेते कॉ. अर्जुन आडे यांनी केले.

या आंदोलनामध्ये नियमित कर्जदार शेतकऱ्यांना २ लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्या, थकीत शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करा, शेतमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभावाचा कायदा करा, पीक विम्याचा परतावा द्या, तालुक्यातील अनेक गावांमध्ये सिंचन तलावांची निर्मिती करा, शेतकरी व शेतमजुरांना वन, गायरान व देवस्थान जमिनीची मालकी द्या, रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांना काम द्या, शेतकऱ्यांना १२ तास मोफत वीज द्या, योजना कर्मचाऱ्यांना किमान वेतन द्या, स्मार्ट मीटर रद्द करा, भारत-अमेरिका व्यापारी करार रद्द करा, चार श्रमसंहिता रद्द करा, तसेच आदिवासी व वंचित घटकांच्या विविध मागण्या आणि किनवट जिल्हा निर्मिती यासह अनेक जनहिताच्या मागण्या करण्यात आल्या.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रॅलीची सुरुवात हुतात्मा गोंडाराजे मैदान येथून घोषणाबाजी करत करण्यात आली. शहरातील मुख्य रस्त्याने ही रॅली उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकली. त्यानंतर विविध मागण्यांचे निवेदन सहायक जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांसोबत विविध प्रश्नांवर चर्चा केली. चर्चेला उत्तर देताना संबंधित विभागांशी मागण्यांबाबत पाठपुरावा करण्याचे आश्वासन सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच स्थानिक मागण्यांसंदर्भात लेखी आश्वासन देण्यात आले.

या आंदोलनात कॉ. अर्जुन आडे, जनार्दन काळे, शेषराव ढोले, शैलीया आडे, सुनीता बोणगीर, आडेलू बोणगीर, इरफान पठाण, सीताराम आडे, अंबर चव्हाण, तानाजी राठोड, मोहन जाधव, मनोज सल्लावार, इंदल राठोड, शेख फरीद बाबा, शेख चांद, नंदू मधुकर, इंदुताई डोंगरे, शिवाजी किरवले, विजय जाधव, रंगराव चव्हाण, सुदाम बर्गे, प्रशांत जाधव, साईनाथ राठोड आदींसह अनेकजण उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com